# विविध भक्तीसंप्रदायाची परंपरा,शिकवण व समन्वय.

**ह.भ.प.डॉ.प्रमोद रामकृष्ण कुमावत.**

**वेदांत तत्त्वज्ञान व संतसाहित्याचे अभ्यासक,कीर्तनकार, अधिव्याख्याता, प्रादेशिक विद्या प्राधिकरण, संभाजीनगर.**

**१) प्रास्ताविक -** संतसाहित्याचा अभ्यास करतांना विविध धर्म,उपासनापंथ किंवा संप्रदायाचा अभ्यास करावा लागतो.बहुतेक धर्माचा उदय हा वैदिक परंपरेतून झालेला आहे तसेच परंपरेतील जटील कर्मकांडाला टाळण्यासाठी झालेला दिसतो. वैदिक धर्म,बौध धर्म,जैन धर्म,याबरोबरच शैव, शाक्त, गाणपत्य, वैष्णव, नाथ, वीरशैव, महानुभाव, वारकरी, समर्थ, दत्तसंप्रदाय, सुफी संप्रदाय इत्यादी संप्रदायामध्ये संत होऊन गेले आहेत व त्यांनी विपुल असे मराठीत साहित्य निर्माण केले आहे.मध्ययुगीन मराठी साहित्याच्या निर्मितीत या पंथांचा व संप्रदायांचा महत्वाचा वाटा आहे. सम्राट अशोक मोर्याच्या काळात महाराष्ट्रात बौध धर्माचा प्रसार झाला.त्यापूर्वी चंद्रगुप्त मौर्याच्या काळात जैन धर्माने दक्षिणेत प्रवेश केला होता.तेराव्या शतकापासून ते अठराव्या शतकापर्यंत विविध संप्रदायांनी आपला प्रभाव महाराष्ट्रावर टाकल्याचे निदर्शनास येते.

**२) जैन धर्म-** जैन या शब्दची उत्पत्ती 'जीन' या शब्दापासून झालेली आहे. 'जी' म्हणजे विजय व 'जीन' म्हणजे विजय मिळविणारा. ज्याने आपल्या मनावर,वाणीवर,कामावर,इंद्रियांवर विजय मिळविला ते जीन होय. हेच धर्माचे तत्त्वज्ञान आहे.ज्यांनी यासार्वांवर विजय मिळविला त्यांना जैन म्हणतात. या धर्माचे जगभर सुमारे पंचेचाळीस लाख अनुयायी आहेत.त्यातील बहुसंख्य भारतात आहेत. विश्वातील सर्व प्राणीमात्रांचे काल्यान्व्हावे हाच या धर्माचा मूलमंत्र आहे.प्रत्येक सजीव प्राण्यात आत्मा आहे म्हणून प्रयेकाला समान वागणूक दिली पाहिजे. त्यालाही जगण्याचा हक्क आहे. 'जियो और जिने दो' हीच या धर्माची खरी शिकवण आहे.प्रयेकाला जगण्याचा हक्क आहे त्याने तो पाळावा.इतरांना ही जगण्यासाठी मदत करावी.अशी मानवतावादी जैन धर्माची शिकवण आहे.जैन हे शाकाहारी असतात.या धर्माचा पुनर्जन्मावर विश्वास आहे. जैनांच्या महापुरुषांना 'निर्ग्रंथ' म्हणतात. निर्ग्रंथ म्हणजे भव बंधनातून मुक्त झालेले संत. जैन धर्माने कुणाचाही द्वेष न करता,वेगळेपणाची भावना न बाळगता सर्वांना एकत्र करून एकात्मतेची शिकवण दिली आहे.जैन धर्मातील प्रत्येक तीर्थांकारणी समाजाला शिकवण दिली आहे.कर्मकांडाचे अवडंबर झाल्यावर ते टाळून जैन धर्माने विचाराची बैठक दिली आहे. जैन धर्माच्या या तत्वज्ञानाचा इतर सर्व धर्म व संप्रदायाशी साम्य पहिले तर हे लक्षात येते कि इतरांच्या तत्त्वज्ञानातही मुक्तीची संकल्पना आहे.इंद्रिय निग्रह किंवा इंद्रियांवर विजय मिळविणे हे सर्वांनी मान्य केलेले आहे.तसेच जैनांमध्ये ज्याला निर्ग्रंथ म्हणतात त्याला वैदिक धर्मात मोक्ष म्हणतात. बौध धर्मात निर्वाण म्हणतात. शब्द भिन्न असतील पण संकल्पना मात्र सारखीच असल्याचे दिसते.

**भूतदया** - मुक्या प्राण्यांना अभय दया.त्यांची काळजी घ्या.गोशाळेला मदत करा किंवा काढा,कासयाच्या तावडीतून प्राण्यांची सुटका करा.सर्वांचा आत्मा एकाच आहे तेव्हा मानवता भाव मनात ठेऊन जागा.

**क्षमा-** जैन धर्माची दुसरी शिकवण म्हणजे क्षमा वृत्तीमाणसाने नेहमी क्षमाशील असले पाहिजे.आपणाकडून कुणी दुखाऊ नये,चुकून कोणी दुखावले गेले असेल तर विनाविलंब माफी मागावी.दुसऱ्यालाही क्षमा करावे.त्याच्या चुकींचा पाढा वाचत बसू नये.

**मौन -** जैन धर्मात मौनाला फार महत्व आहे.जिव्हेवर ताबा मिळविणे फार कठीण आहे.तपाने जिव्हेवर ताबा मिळवावा.संतुलित आहार घेऊन ताबा ठेवा.खाण्यापिण्यावर ताबा,वाणीवर ताबा असे केले तर तुमचे कर्मबंधन कमी होतील व तुम्ही शांततेने जगू शकाल.

**निर्मोही बना-** कोणत्याही प्रकारची अपेक्षा ठेऊ नका.अपेक्षाच दु:खाचे मूळ आहे.आसक्ती ठेऊ नये.पाचही विषयापासून लांब राहाण्याचा प्रयत्न करा.

**पार्श्वनाथ -** जैन धर्मात चोवीस तीर्थंकर होऊन गेले आहेत.यापैकी पार्श्वनाथान जे २३ वे तीर्थंकर आहेत यांनी ८३ दिवस कठोर तप करून कैवल्याची प्राप्ती करून घेतली आणि आपल्या अनुभवातून काही उपदेश समाजाला केला तो असा.

**उपदेश-**१.अहिंसा व्रत २.सत्य व्रत ३.अस्तेय व्रत ४.अपरिग्रह व्रत.

**भगवान महावीर -** हे चोविसावे तीर्थंकर होय.यांचा जन्म इ.पू.५९५ मध्ये झाला.वयाच्या तिसाव्या वर्षीच घराचा त्याग केला व सत्याच्या शोधात निघाले.१२ वर्षे कठोर तप करून त्यांना सत्याचा शोध लागला.त्यांनी उर्वरित आयुष्य समजाच्या कल्याणासाठी वेचले.

**तत्वज्ञान -** १. आत्म्याच्या अस्तित्वाविषयी विस्वास.

२.निर्वाण संकल्पना मान्य.

३.पंच महाव्रत -१.ब्रम्हचार्य २.सत्य ३. अपरिग्रह ४. अचौर्य ५.अहिंसा

४.साद्वात चा सिद्धांत (स्वाध्याय)

५.कतिपय (अन्य उपदेश)

महावीरांचे कार्य फार मोठे आहे त्यामुळे त्यांना धर्माचे संस्थापक मानतात.जैन धर्म अवतारांना मानीत नाहीत.यामध्ये दोन मुख्य प्रवाह दिसून येतात.

१.श्वेतांबर -या प्रवाहातील संत पांढरे वस्त्र परिधान करतात म्हणून श्वेतांबर.

२.दिगंबर - दिग म्हणजे दिशा ज्यांनी केवळ दाही दिशानाच वस्त्र समजून फिरत राहतात ते दिगंबर.हे वस्त्र परिधान करीत नाहीत.

वैदिक धर्मातील जटिलता, क्लिष्टता काढून सामान्य माणसालाही कैवल्याची प्राप्ती होवू शकते या अनुशंगाने आपले तत्वज्ञान मांडले.आत्म्याचे अस्तित्व चार्वाक,बौद्ध सोडून जवळपास सर्वानीच मान्य केले आहे.जैनानीही आत्म्याचे अस्तित्व मान्य केले आहे. निर्वाण म्हणजेच कैवल्य,मोक्ष, निर्ग्रंथ हे

जैनांना मान्य आहे.जैनांची पंच महाव्रते तर सर्वांनाच मान्य आहेत.अगदी चार्वाकवादी मनुष्यही हे मान्य करील.म्हणून जैन धर्म इतर धर्माप्रमाणे माणसाच्या उन्नतीला,उद्धाराला दिशा देणारा धर्म आहे.

**३) बौध धर्म -** बुद्ध कोणाला म्हणावे तर ज्याच्या बुद्धीला बोध झाला आहे तो बुद्ध.विवेकाशिवाय बुद्धी सत्याला जाणू शकत नाही.म्हणून बुद्धीमध्ये विवेक,वैराग्य,स्वाध्याय,सुचीत्व असे अनेक चांगल्या बाबीने उन्नयन करावे लागते.

गौतम बुद्ध - गौतम बुद्धांचा जन्म इ.पू.६८३ मध्ये झाला. सिद्धार्थची कथा सर्वांनाच परिचित आहे. सिद्धार्थ या राजकुमाराने चार दृश्य पहिले आणि जीवनाचे सत्य शोधण्यासाठी गृहत्याग केला बोधी वृक्षाखाली बसून साधना केली आणि सत्याचा शोध घेतला

**चार दृश्य ज्यामुळे मनपरिवर्तन झाले-**१.रोगी मनुष्य २.म्हातारा मनुष्य ३.मृत मनुष्य ४.संन्यासी

**तत्वज्ञान-** १.शुद्ध आचरण.२.शुद्ध विचार ३.शुद्ध कर्म ४.शुद्ध भावना

**चार आर्यसत्य -** १.सर्व दु:खम २.दु:ख समुदाय ३.दु:ख निरोध ४.दु:ख निरोध मार्ग

**अष्टांगिक मार्गसंपादन करा -** १. सम्यक दृष्टी(सत्य) २.सम्यक संकल्प सत्य विचार) ३.सम्यक वचन (सत्य वचन) ४.सम्यक कर्म (सत्य कर्म) ५.सम्यक आजीव (सत्य जीविका) ६.सम्यक व्यायाम (सत्य व ज्ञानयुक्त होणे) ७.सम्यक स्मृती (सत्याची स्मरण)८.सम्यक समाधी (चित्त एकाग्र करणे) अष्टांग मार्ग हा सदाचाराचा मार्ग होय. याला मध्यम मार्ग सुद्धा म्हणतात. ह्या आठ गोष्टींच्या पालनामुळे मानवाचे जीवन सुखमय होते. त्या गोष्टी अश्या :

१) सम्यक दृष्टी :- निसर्ग नियमाविरुद्ध कोणतीही गोष्ट न होऊ देणे.

२) सम्यक् संकल्प :- म्हणजे योग्य निर्धार, विचार.

३) सम्यक् वाचा :- करुणायुक्त व सत्यपूर्ण वाचा (बोल) ठेवण्याचा प्रयत्न करणे.

४) सम्यक् कर्मान्त :- उत्तम कर्म म्हणजे योग्य कृत्ये करणे.

५) सम्यक् आजीविका :- वाईट मार्गाने आपली उपजीविका न करता ती सन्मार्गानेच करणे.

६) सम्यक् व्यायाम :- वाईट विचार निर्माण झाल्यास त्याचा त्वरित नाश करणे.

७) सम्यक् स्मृती :- तात्त्विक गोष्टींचे स्मरण करून चित्तास (मनाला) जागृत ठेवणे.

८) सम्यक् समाधी :- कोणत्याही वाईट विकारांना स्पर्श होऊ न देता दुष्ट प्रवृत्तींपासून मन अलग ठेवून चित्त प्रसन्न आणि शांत ठेवणे.

**दहा पारमितासंपादन करा :-** दहा पारमिता ह्या शील मार्ग आहेत.

१) शील :- शील म्हणजे नीतिमत्ता, वाईट गोष्टी न करण्याकडे असलेला मनाचा कल.

२) दान :- स्वार्थाची किंवा परतफेडीची अपेक्षा न करता दुसऱ्याच्या भल्यासाठी स्वतःची मालमत्ता, रक्त, देह अर्पण करणे.

३) उपेक्षा :- निरपेक्षतेने सतत प्रयत्न करीत राहणे.

४) नैष्क्रिम्य :- ऐहिक सुखाचा त्याग करणे.

५) वीर्य :- हाती घेतलेले काम यत्किंचितही माघार न घेता अंगी असलेल्या सर्व सामर्थ्यानिशी पूर्ण करणे.

६) शांति :- शांति म्हणजे क्षमाशीलता, द्वेषाने द्वेषाला उत्तर न देणे.

७) सत्य :- सत्य म्हणजे खरे, माणसाने कधीही खोटे बोलता कामा नये.

८) अधिष्ठान:- ध्येय गाठण्याचा दृढ निश्चय.

९) करुणा :- मानवासकट सर्व प्राणिमात्रांविषयी प्रेमपूर्ण दयाशीलता.

१०) मैत्री :-मैत्री म्हणजे सर्व प्राणी, मित्र, शत्रू याविषयीच नव्हे तर सर्व जीवनमात्रांविषयी बंधुभाव बाळगणे.

**आचरणाचे दहा नियम -**

१.अहिंसा पालन

२.असत्य परित्याग

३.चोरी न करणे.

४.संग्रह न करणे.

५.भोगासक्त नसणे

६.नाच गाण्याचा त्याग करणे.

७.अत्तर,सुगंधित वस्त्राचा त्याग करणे.

८.अवेळी भोजनाचा त्याग करणे.

९.कोमल शैय्येचा त्याग करणे.

१०.कामिनी कांचन त्याग करणे.

हिंसेवर विजय प्राप्त करणारा धर्म म्हणजे बौद्ध धर्म होय.वरील तत्त्वज्ञान पाहता इतर धर्माशी तसेच संप्रदायाशी याचे साम्य असल्याचे लक्षात येते.कोणताही धर्म वा संप्रदाय मनुष्यमात्राच्या कल्याणासाठीच असतो हे अधोरेखित होते.

**४) हिंदू धर्म-** हिंदू धर्म हा भारतातील उपखंडातील सर्वात मोठा धर्म वा जीवनपद्धती आहेसंस्कृत भाषेत याचा अर्थ शाश्वत मार्ग असा होतो.निरीश्वरवाद,सर्वेश्वरवाद,अनेकेश्वरवाद,एकेश्वरवाद,नास्तिकता अशी अनेक रूपे या धर्मात एकत्रितपणे पहावयास मिळतात. हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानाचा स्रोत मुख्यत्वे वेद आहेत.एकाच वेद चार विभागात विभागला गेला आहे. १.ऋग्वेद २. यजुर्वेद ३. अथर्ववेद ४. सामवेद असे चार वेद आहेत.प्रत्येक वेदाचे चार भाग आहेत.त्याला संहिता,ब्राम्हण,आरण्यक व उपनिषद असे म्हणतात.यातील आरण्यक व उपनिषद यामध्ये प्रामुख्याने तत्त्वज्ञानाची चर्चा केलेली आहे. चारतील हा अंतिम भाग असल्याने याला वेदांत असे म्हणतात. वेदांतात म्हणजे उपनिषदात ब्रम्हस्वरुपाच्या अस्तित्वाची चर्चा केलेली आहे.हे तत्वज्ञान अत्यंत सुंदरपद्धतीने मांडलेले आहे त्यामुळे

याची भुरळ भारतातील विद्वानांसोबत पाश्चात्य विद्वानांना ही पडलेली आहे.यावर आजही संशोधन होणे आवश्यक आहे.

**उपनिषद:-** उपनिषदांची निर्मिती ही ई.पू.८०० ते इसवीसनाच्या प्रारंभापर्यंत झाली असल्याचे अभ्यासक सांगतात. वेदांची निर्मिती हि अपौरुषेय आहे असे म्हणतात. कारण वेद कोणी लिहिले आहेत हे सांगता येत नाही. अभ्यासकांच्या मते वेदाच्या लेखनाची प्रक्रिया हि गुरु शिष्य परंपरेतून अखंडपणे झाली असल्याची शक्यता आहे.लिहिणारे हे अनुभवी संत असल्याने त्यांना उपाधीची आवश्यकता वाटली नसावी म्हणून त्यांनी आपल्याबाबतीत काहीच लिहून ठेवले नाहीउपनिषदे ही ज्ञानाची मोठी स्रोत आहेत. भारतात याच तत्त्वज्ञानावर अनेक संप्रदायाची निर्मिती झाली आहे.शैव,वैष्णव,शाक्त,दत्त आदी संप्रदाय औपनिषदिक ज्ञानाचा प्रभाव आहे.

**पाश्चात्य विद्वानांवर भारतीय तत्त्वज्ञानाचा प्रभाव :-**

१.अरबदेशीय विद्वान अल्बेरुनी हा ११ व्या शतकात म्हणजे १०३० मध्ये भारतात आला होता.येथे त्याने संकृतचा सखोल अभ्यास केला व उपनिषदे व गीता या ग्रंथांचा अभ्यास केला. या ग्रंथांचा त्याच्यावर मोठा प्रभाव पडला. तो या ग्रंथांच्या प्रेमात पडला.

२.मुगल सम्राट शहाजहा यांचा ज्येष्ठ मुलगा दाराशिकोह हा औरंगजेबासारखा कट्टर धर्मवेडा नव्हता.उपनिषदांचे महत्व ऐकून त्याला या ग्रंथांचा अभ्यास करण्याची इच्छा झाली.संस्कृत मधील उपनिषद त्याने फारसी भाषेत अनुवादित केली.त्याच्यावर उपनिषदांचा मोठा प्रभाव पडला होता. फारसी भाषेतून उपनिषदे ही फ्रान्सीसी भाषेत अनुवादित झाली फ्रान्सीसी भाषेत असलेले ग्रंथ जर्मन तत्त्वज्ञ शोपेनहवर याने अभ्यासले. त्याच्यावर उपनिषदामधील तत्वज्ञानाचा एवढा प्रभाव पडला कि त्याने या ग्रंथांची मुक्त कंठाने प्रशंसा केली. तो म्हणतो “उपनिषदातील उच्च तत्त्वज्ञान जगातल्या दुसऱ्या कोणत्याच ग्रंथात असू शकत नाही.” यासोबातच मॅक्समुलर,पॉल,डायसन,कान्ट,या विद्वानांवर ही या ग्रंथांचा प्रभाव दिसून येतो.

**भारतातील विविध संप्रदाय :-**

**४.१.नाथ संप्रदाय**

**४.२.महानुभाव संप्रदाय**

**४.३.वारकरी संप्रदाय**

**४.४.दत्त संप्रदाय**

**४.५.समर्थ संप्रदाय**

**४.६.वीरशैव संप्रदाय**

**४.७.नागेश संप्रदाय**

**४.८.सुफी संप्रदाय**

**४.९.आनंद संप्रदाय**

**४.१.नाथ संप्रदाय :-** हा एक भारतीय शैव संप्रदाय आहे. या संप्रदायाचा उगम सुमारे आठवे ते बारावे शतकादरम्यान झालेला दिसतो. भगवान शिव याच्यापासून या संप्रदायाची सुरुवात झाली, अशी सांप्रदायिकांची समजूत असल्यामुळे, याला नाथ संप्रदाय म्हणतात. 'नाथ' म्हणजे रक्षण करणा रा, स्वामी व नाथ संप्रदाय म्हणजे रक्षण करणाऱ्या स्वामींचा संप्रदाय होय. नाथयोगी 'नाथ' परमेश्वर हे परमपद मानून ते मिळविण्यासाठी योगाचरण करतात. संप्रदायाची दीक्षा घेतल्यावर साधक आपल्या नावापुढे 'नाथ' ही उपाधी लावतात. योगमार्गाने सिद्धावस्था किंवा अवधूतावस्था प्राप्त करणे, हे या पंथाच्या अनुयायांचे ध्येय असल्यामुळे हा पंथ योग संप्रदाय, सिद्ध संप्रदाय आणि अवधूत संप्रदाय या नावांनी ओळखला जातो. तसेच त्याला दर्शनी ('दर्शन' कर्णकुंडल धारण करणारा), गोरख पंथ, गोरखनाथी संप्रदाय, कानफाटा संप्रदाय (कानफाटे), गुरू संप्रदाय इ. नावेही आढळतात परंतु नाथ संप्रदाय वा नाथ पंथ हेच नाव अधिक रूढ आहे.

आदिनाथ शिव हे संप्रदायाचे मूळ प्रवर्तक असले, तरी त्यांचे शिष्य मच्छिंद्रनाथ (मत्स्येंद्रनाथ) हेच संप्रदायाचे पहिले मानवी गुरू होत. संप्रदायाला नावारूपाला आणण्याचे खरे श्रेय मात्र गोरख नाथांनाच द्यावयास हवे. मत्स्येंद्राचा गुरुबंधू जालंधर आणि जालंधराचा शिष्य कानिफनाथ यांनाही संप्रदायात मोठी मान्यता होती. संप्रदायाचे उगमस्थान म्हणून हिमालय, नेपाळ, पंजाब, उत्तर प्रदेश, आसाम, बंगाल, महाराष्ट्र, आंध्रमधील श्रीशैलम् पर्वत इ स्थाने वेगवेगळ्या विद्वानांनी सांगितली आहेत.

**गुरु परंपरा:-** आदिनाथ - पार्वती - मस्त्येन्द्रनाथ - गोरक्षनाथ - गहिनीनाथ -निवृत्तीनाथ

**तत्त्वज्ञान व साधना :-** शंकराने पार्वतीला सांगितलेले तत्त्वज्ञान मच्छिंद्राने मासोळीच्या पोटातून ऐकले व तेच पुढे मानवांना प्राप्त झाले, अशी आख्यायिका ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांनी सांगितली आहे. मच्छिंद्राने समाजाच्या प्राथमिक अवस्थेपासून चालत आलेला सुफलता विधी म्हणजे योगिनी कौल मार्ग व नाथ संप्रदाय या दोहोंचे एकीकरण केले. मच्छिंद्रांच्या ग्रंथांतून प्रामुख्याने योगमुक्त कौल मार्गाचे विवेचन आहे, तर गोरखनाथांच्या सिद्धसिद्धांतपद्धतीमध्ये नाथ संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची चर्चा आहे. दोघांचेही एकच अंतिम ध्येय असते आणि ते म्हणजे शिव व शक्ती यांचे सामरस्य प्राप्त करणे हे होय. त्यांच्या साधनापद्धतीत मात्र फरक असतो. योगी प्रथमपासूनच कुंडलिनी जागृत करण्याची अंतरंग साधना करतात, तर तांत्रिक प्रथम बहिरंग उपासना करून नंतर अंतरंग साधनेकडे वळतात. योगी भोग वर्ज्य करून अष्टांगयोगसाधनेच्या द्वारे समाधीतील आनंद प्राप्त करतात, तर कौल साधक पूजा करताना मद्य, मांस, मत्स्य, महिला (मैथुन) व मुद्रा या पंचमकारांचे म्हणजे कुलद्रव्यांचे सेवन करून सिद्धी मिळवितात व सातव्या उल्लासाच्या अवस्थेत पोहोचतात.

सर्व साधना गुरूच्या मार्गदर्शनानेच करावयाची असल्यामुळे नाथ संप्रदायात गुरूचे स्थान अत्यंत महत्त्वाचे असते. गुरुहीन राहू नये असे गोरक्षनाथाने स्पष्टपणे सांगितले आहे. गुरूविषयी आदर, मनाची शुद्धता व दृढता, विकारांचा अभाव, गर्वहीनता, धैर्य, शील, सदाचरण, खाण्यापिण्यात मध्यम

मार्ग, ब्रह्मचर्य इ. गुण साधकाच्या अंगी हवेत. नाद (वाणी) व बिंदू (वीर्य) यांचे संयमन करणारा योगी साक्षात शिवरूप होय. याउलट मादक वस्तूंचे सेवन करणारा नरकाला जातो, असे सांगितले आहे.

**गोरक्षसिद्धांतसंग्रह या ग्रंथातील महत्त्वाचे विचार पुढीलप्रमाणे आहेत** :- ओंकार हा सूक्ष्म वेद आहे मुक्ती म्हणजे नाथस्वरूपात स्थिर होण्याची अवस्था होय. शक्ती सृष्टी करते, शिव पालन करतो, काल संहार करतो व नाथ मुक्ती देतात. नाथ हाच एकमात्र शुद्ध आत्मा असून बाकीचे जीव असतात. नाथ हे सगुण-निर्गुणाच्या पलीकडचे असतात. अद्वैताच्या वर सदानंददेवता असून सदानंदावस्था हेच साध्य असते.

**वेष** :- नाथ संप्रदायी योग्यांचा एक विशिष्ट वेष असतो. योगी शरीरावर भस्म लावतात. कपाळ, बाहुमूल व हृदयदेशावर त्रिपुंड्र लावतात यांखेरीज 'कुका' हे एकतारी वाद्य, पुंगी, दंडा, त्रिशूळ, अधारी (एक आसनपीठ) डमरू, खड्ग, झोळी, कुबडी, मृदंग, टाळ, चिमटा, खडावा, कौपीन, धुनी, गोपीचंदन, गुलाल, बुक्का इ. वस्तू वा चिन्हे धारण करतात. चर्पटीनाथांनी मात्र या बाह्य वेषांच्या अवडंबराला प्रखर विरोध केला होता.

**उपास्य दैवते** :- नाथ हा शैव संप्रदाय असल्यामुळे शिव हे त्याचे मुख्य दैवत होय. या संप्रदायात शाक्तांचा समावेश झाल्यामुळे शक्तीची काली, दुर्गा, बालसुंदरी, त्रिपुरासुंदरी, अंबा, जगदंबा इ. रूपे उपास्य ठरली. यांशिवाय, भैरवी अष्टनायिका, मातृका, योगिनी, शाकिनी, डाकिनी आणि इतर उग्रस्वभावी देवींची उपासनाही संप्रदायात केली जाते. त्रिपुरासुंदरीशी एकरूप होऊन अभेदज्ञान प्राप्त करण्यासाठी काही योगी स्वतःला स्त्री मानून तिचे चिंतन करतात. शिवाची भैरव, नंदभैरव, कालभैरव, एकलिंग इ. रूपेही उपास्य आहेत. भैरवाकडून जारणमारणाचे सामर्थ्य मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. भैरवाचा प्याला नाथयोग्यांत प्रसिद्ध आहे.

**इतर संप्रदायांशी संबंध** :- भारताच्या आणि विशेषतः महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासात या संप्रदायाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. गोरखशिष्य अमरनाथ आणि प्रामुख्याने गहिनीनाथ हे महाराष्ट्रातील नाथ संप्रदायाचे मूळ पुरुष होत. ज्ञानेश्वर-नामदेवांसारखे वारकरी संप्रदायातील संत परंपरेने नाथ संप्रदायाशी संबद्ध असल्यामुळे नाथ संप्रदायातील विचारप्रवाह वारकरी संप्रदायात प्रविष्ट होऊन वाहू लागला. ज्ञानेश्वरांचे पणजे त्र्यंबकपंत यांना गोरखनाथांचा आणि ज्ञानेश्वरांचेच आजे गोविंदपंत, आजी नीराबाई व बंधू निवृत्तीनाथ यांना गहिनीनाथांचा अनुग्रह होता. निवृत्तिनाथांकडूनच ज्ञानेश्वरांना नाथ संप्रदायाचा वारसा मिळाला. ज्ञानेश्वरी हा नाथ तत्त्वज्ञानाचा ठेवा आहे, असे ज्ञानेश्वरांनी म्हटले आहे. नाथजोग्यांची वंशावळी हीच ज्ञानदेवादी भावंडांची जातिकुळावेगळी वंशावळी, असे मानले जाते. ज्ञानेश्वरांची सर्व भावंडे, मराठीतील आद्यकवी मुकुंदराज, विसोबा खेचर इ. व्यक्ती नाथपरंपरेतीलच होत्या. महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर यांचे गुरू गुंडम राऊळ व आजेगुरू चांगदेव राऊळ हे दोघेही नाथसिद्ध होते. स्वतः चक्रधरांचा इतर अनेक नाथसिद्धांशी संबंध आला होता. ते नाथवाणीची स्तुती करताना आढळतात. आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी महानुभाव पंथ स्थापन केला असला, तरी त्या अगोदर त्यांच्यावर नाथ संप्रदायाचाच प्रभाव असल्यामुळे एका दृष्टीने महानुभाव पंथाचा उगम नाथ संप्रदायातूनच झाला, असे म्हणता येते. दत्त संप्रदाय व नाथ संप्रदाय यांचाही

निकटचा संबंध आहे. नाथ आणि दत्तात्रेय या दोघांनाही 'अवधूत' हे नाव आहे. नाथ संप्रदायात गुरूचे स्थान महत्त्वाचे असते आणि म्हणूनच आदर्श गुरू असलेल्या दत्तात्रेयाला नाथपंथी पूज्य मानतात. अवधूतगीता दत्ताने गोरक्षाला सांगितली, अनेक नाथांना दत्ताचा अनुग्रह होता, आदिनाथाच्या सांगण्यावरून दत्त्ताने मत्स्येंद्राला उपदेश केला इ. कथा आढळतात. दत्त संप्रदायी एकनाथांनी नारायण-ब्रह्मा-अत्रिनाथ-दत्त-जनार्दन-एकनाथ अशी आपली परंपरा सांगितली आहे. समर्थ संप्रदाय आणि नाथसंप्रदाय यांचा प्रत्यक्ष संबंध आढळत नसला, तरी समर्थ रामदासांनी व त्यांच्या शिष्यांनी नाथांविषयीही आदर व्यक्त केला आहे. समर्थांनी दासबोधाच्या आधारग्रंथात अवधूतगीतेचा समावेश केला असून त्यांनी नाथसिद्धांचा आरतीत उल्लेख केला आहे. महाराष्ट्रात इतरही अनेक नाथपरंपरा आढळतात.

वैष्णव, बौद्ध, जैन, शाक्त, सांख्य, योग इ. अनेक मार्गांचे लोक गोरखनाथाचे अनुयायी झाले आणि त्यामुळे नाथ संप्रदायाचा भारतातील इतर अनेक धर्मपंथांशीही कोणत्या ना कोणत्या स्वरूपात संबंध आलेला आहे. त्याचा वैष्णव संप्रदायाची संबंध असल्याचे पुढील अनेक गोष्टींवरून सूचित होते. मत्स्येंद्र हा महाविष्णू, निवृत्तिनाथ हा शिव आणि ज्ञानदेव हा विष्णू अशी सांप्रदायिकांची समजूत आहे गहिनीनाथांनी निवृत्तिनाथांना कृष्णभक्तीचा उपदेश केला 'कपिलानी' ही नाथ संप्रदायाची शाखा मूळची वैष्णव योगावर आधारलेली होती आणि अवधूत हा नाथवाचक शब्द वैष्णव संन्याशांनाही लावला जातो.

**४.२) महानुभाव संप्रदाय:-** महानुभाव पंथ महाराष्ट्रात उगम पावलेला असला तरी त्याचा प्रसार उत्तर भारतात पंजाब आणि काश्मीरपर्यंत झाला. उत्तरेकडे या संप्रदायाला जयकृष्णी पंथ म्हटले जाते. आजही उत्तर भारतात या संप्रदायाचे आश्रम व महंत आहेत. महानुभाव संप्रदायाचे तेरा आम्नाय आहेत. कवीश्वर आम्नाय हा त्यांतील एक होत. मुरारी बास हे याच आम्नायातले आहेत. तत्त्वाचिंतनात्मक लेखन हे त्यांचे एक वैशिष्ट्य आहे. ग्रंथांवर भाष्ये-महाभाष्ये लिहिली गेली. भाष्यलेखनाची परंपरा व्यापक, प्रदीर्घ व भाष्य-लेखन सातत्य टिकविणारी आहे. महानुभाव संप्रदायाचे प्रवर्तक व अवतारस्वरूप श्री चक्रधरस्वामी यांनी बाराव्या तेराव्या शतकात आपल्या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची वैशिष्ट्ये सूत्ररूपाने 'दृष्टान्तपाठ' या ग्रंथात सांगितली. या ग्रंथावरील भाष्ये अनेक महानुभाव संतकवींनी व भाष्यकारांनी केली. हा इतिहासही महानुभाव साहित्याचे वेगळपण सिद्ध करणारा आहे. याच भाष्यलेखनमालिकेतील मुरारीबासांचा 'दृष्टान्तप्रबोध' हा ग्रंथ होय. या संप्रदायातील अनेक भाष्यकार संस्कृतज्ञ विद्वान आणि त्यांनी आपले भाष्यग्रंथ स्वामींच्या आदेशानुसार लोकभाषा मराठीतून लिहिले आहे.

यादव काळात, सुमारे १३ व्या शतकात महानुभाव हा अत्यंत लोकप्रिय पंथ होता. या पंथाची स्थापना करणाऱ्या चक्रधर स्वामींना लोक "पंचकृष्णां" पैकी एक अवतार मानीत असत. या पंथांची वैदिक धर्मावर श्रद्धा नसली तरी त्याबद्दल स्वामींना आस्था होती. एक सामाजिक गरज म्हणून चातुर्वर्ण्यावर महानुभावांचा विश्वास आहे. मात्र तत्त्व म्हणून ते जातिभेद, स्त्री-पुरुष भेद मानीत नाहीत. ते कृष्णभक्त आहेत आणि कृष्णाचे पाच अवतार झाले असे मानतात. ते भक्तिमार्गी असून काही नियम पाळतात. त्यातील प्रमुख चार नियम म्हणजे शणागती, प्रसाद सेवा, मूर्तिध्यान वा मूर्तिज्ञान आणि

नामस्मरण हे होत. यतिधर्म (संन्यास) व गृहस्थधर्म या दोहोवर त्यांचा भर आहे स्त्रियांना मठांत संन्यासिनी म्हणून जगण्याचा अधिकार आहे. ते अहिंसा, शाकाहार, सात्त्विक जीवन, भिक्षा मागणे व देशभ्रमण या गोष्टी काटेकोरपणे पाळतात. त्यांनी एक सांकेतिक लिपी शोधून काढली. ती नऊ तऱ्हांनी लिहिता येते. मराठी भाषेवर महानुभावांचे फार मोठे उपकार आहेत; तसेच त्यांनी भारतीय तत्त्वज्ञानात मोलाची भर घातली आहे. त्यांचे सूत्रपाठ, सतिग्रंथ, आख्यान काव्य, साधना ग्रंथ, टीकाग्रंथ आणि भाष्यग्रंथ अत्यंत मोलाचे आहेत. सोळाव्या शतकात महानुभाव पंथाचा प्रसार पंजाबमध्ये झाला. कृष्णराज नावाच्या पंजाबी व्यापाऱ्याने हा धर्मग्रंथ तिकडे नेला. ते पुढे कृष्णमुनी म्हणून प्रसिद्धीस आले. त्यांचा हा संप्रदाय जयकृष्ण पंथ म्हणून पंजाबमध्ये प्रसिद्ध आहे. मराठीत लिहिलेले सूत्रपाठ हिंदी अथवा पंजाबी मातृभाषा असलेले अनुयायी अद्यापही वाचतात सतराव्या शतकात मोगल बादशहा औरंगजेब याने पंथाला जिझिया करापासून मुक्त केले कारण त्याला ते हिन्दू फकीर वाटले. गेली साडेसातशे वर्षे हा पंथ महाराष्ट्रात, मध्य प्रदेशात व पंजाबमध्ये अस्तित्वात आहे. महानुभावांची कृष्णाची मंदिरे मुंबई, दिल्ली व अमृतसर या ठिकाणी आढळतात

महानुभाव पंथ व साहित्य

यादवराजांच्या कारकिर्दीत, बाराव्या शतकात, महाराष्ट्रात महानुभाव पंथ उदयास आला. सामान्यांना त्यांच्या भाषेत मोक्षमार्ग सुलभ करून सांगणारे जैन, नाथ, लिंगायत, आदी पंथ यापूर्वीच प्रस्थापित झाले होते. या काळात कर्मकांडाचे प्रस्थ वाढून सकाम भक्तीचे बंड माजले होत. सर्वांसाठी खुल्या असणाऱ्या महानुभाव पंथाने जातिनिरपेक्षतेचा आणि अहिंसा तत्त्वाचा पुरस्कार केला

'महानुभाव' या नावाने हा पंथ जरी आज ओळखला जात असला, तरी त्याची 'महात्मा', 'अच्युत', 'जयकृष्णी', 'भटमार्ग', 'परमार्ग' अशी अन्य नावेही आहेत. गुजराततेत 'अच्युत पंथ' व पंजाबात 'जयकृष्णी पंथ' ही नावे लोकप्रिय आहेत. ही दोन्ही श्रीकृष्णभक्तीचा द्योतक आहेत. या पंथातील अनुयायी परस्परांस 'महात्मा' म्हणत. 'भटमार्ग' हे नाव पंथसंस्थापक चक्रधरांचा पट्टशिष्य नागदेव किंवा भटोबास याच्या नावावरून आलेले आहे.

चक्रधरोक्त सिद्धान्तसूत्रपाठाप्रमाणेच गीता हा या पंथाचा प्रमुख धर्मग्रंथ असून श्रीकृष्णलीलावर्णन करणारे भागवत ते प्रमाण मानतात. कृतयुगात हंसावतार, त्रेतायुगात दत्तावतार, द्वापारयुगात श्रीकृष्ण आणि कलियुगात चक्रधर असे चार अवतार त्यांच्या मते असून त्यांचा दत्त हा एकमुखी आहे द्वारकाधीश कृष्ण, दत्तात्रय, द्वारावतीचे चांगदेव राऊळ, ऋद्धिपूरचे गोविंदप्रभू आणि प्रतिष्ठानचे चक्रधर असे कृष्णाचे पाच अवतार ते मानतात. त्यांपैकी दत्तात्रय, श्रीकृष्ण चक्रधर हे उभयदृश्य पूर्णावतार होत.

**महानुभावीय तत्त्वज्ञान:-** जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर ही अनादि व अनंत मूळ चार तत्त्वे असून परमेश्वर नेहमी मनुष्यरूप धारण करून अवतार घेतो मनुष्यरूपानेच प्राणिमात्रांचे उद्धरण परमेश्वरास करता येईल, अशी त्यांची श्रद्धा आहे. प्रपंच हा अनित्य असून अनादि अविद्यायुक्त जीव बद्धमुक्त, देवता नित्यबद्ध आणि परमेश्वर हा नित्यमुक्त आहे; जीव अनंत असून परमेश्वराचे

अवतारही अनंत आहेत. जीवेश्वराचा संबंध हा स्वामिभृत्यासारखा आहे, असे ते मानतात. या दृष्टीने हा पंथ द्वैती असून आत्मा आणि परमात्मा वेगळे मानणारा आहे.

अविद्येपासून मुक्त होऊन ईश्वरस्वरूपाचा आनंद भोगण्याची पात्रता जीवाच्या ठिकाणी असल्याने महानुभावांनी जीवास 'बद्धमुक्त' मानले आहे. प्रपंचाचे स्वरूप अष्टभैरवस्थित पंचमहाभूते व त्रिगुण यांच्यापासून निर्माण झालेली सृष्टी असे असून त्याचे 'कारण प्रपंच' व 'कार्य प्रपंच' असे दोन भाग केले आहेत. 'कारण प्रपंच' हा अनादि अनंत म्हणूनच नित्य आहे. कार्यरूप प्रपंच हा व्यक्त आणि अनित्य होय. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, 'प्रपंचु संहारे' असे म्हटले असल्यामुळे प्रपंच अनित्य वर्गातला आहे, यात शंका राहत नाही. अविद्या अनादि मानली तरी ती नित्य असली पाहिजे, असे अनुमान करण्याचे कारण नाही. कारण-अविद्या व कार्य-अविद्या मोक्षस्थितीत संपूर्ण नाश पावतात, असे गौतम बुद्ध व शंकराचार्य यांचे मत आहे, तेच चक्रधर स्वामींनी मान्य केले आहे.

देवतांचे नऊ थोवे महानुभावीयांनी कल्पिले असून त्यांची प्रत्येक ब्रह्मांडातील संख्या एक्क्याऐंशी कोटी सव्वा लक्ष दहा इतकी आहे, असे ते समजतात. त्या नित्यबद्ध, भावरूप पण अव्यक्त आणि ज्ञान, सुख, ऐश्वर्य, प्रकाश व सामर्थ्य यांनी युक्त असल्या, तरी परमेश्वररूप नव्हेत. देवतांचे मुख्य कार्य सृष्टीतील जीवांना त्यांच्या कर्माची सुखदुःखात्मक फळे देणे हे आहे अशी त्यांची धारणा असते. अद्वैत वेदान्तामध्ये ब्रह्मस्वरूप हे अंतिम सत्य व ईश्वर हे ब्रह्माचे सोपाधिक म्हणजे गौण स्वरूप मानले आहे.

महानुभाव तत्त्वज्ञानानुसार परमेश्वराचे (१) अवतरदृश्यावतार, (२) परदृश्यावतार, (३) उभयदृश्यावतार असे तीन प्रकारचे अवतार आहेत. परमेश्वर नित्यमुक्त असल्याने तोच जीवाचा उद्धार करू शकतो. त्या त्या युगातील देहधारी जीव साकार परमेश्वराच्या सन्निधानाने आपला उद्धार करून घेतात. मात्र जीवाचे उद्धरण म्हणजे अद्वैत्यांची मुक्ती नव्हे. मुक्तीनंतरही जीवाचे अस्तित्व टिकून राहते. ईश्वराकडून शब्दज्ञान झाले, तरी मोक्षमार्गाने जाण्यासाठी अनुसरणाच्या मार्गाचा अवलंब करून वयाच्या छप्पन्नाव्या वर्षापूर्वी सर्वेंद्रिये कार्यक्षम असताना संन्यास घेणे आवश्यक आहे. संन्यास घेऊन परमेश्वराला अनुसरल्यानंतर देहान्तापर्यंत साधकाला 'असती-परी' आचरावी लागते. महानुभावांचे उपदेशी आणि संन्यासी असे दोन वर्ग असून उपदेशी वर्ग लौकिक जीवनात चातुर्वर्ण्य पाळतो. संन्यासदीक्षेनंतर मात्र जातिनिर्बंध पाळण्याची आवश्यकता नाही.

महानुभावांच्या मराठीविषयक आत्मीयतेच्या भावनेमुळे या पंथातील व्यक्तींनी विविध वाङ्मयप्रकारांत रचना करून मराठी साहित्य समृद्ध केला आहे. स्मृतिसंकलनात्मक गद्य चरित्रवाङ्मय ही या पंथाची मराठी साहित्यास लाभलेली महत्त्वाची देणगी होय. महानुभाव वाङ्मयात चरित्रे, सूत्रवाङ्मय, टीकावाङ्मय, न्याय-व्याकरणादी शास्त्रे, क्षेत्र व व्यक्तिमहात्मवर्णने, स्तोत्रे इ. प्रकारचा समावेश आहे. निरनिराळ्या काळात पंथातील प्रतिभासंपन्न कवींनी लिहिलेल्या सात काव्यांना साती ग्रंथ म्हटले जाते. यात नरेंद्रांचे रुक्मणीस्वयंवर; भास्करभट्ट बोरीकरांचे शिशुपालवध व उद्धवगीता. दामोदर पंडितांचा वछाहरण, रवळो व्यासकृत सैह्याद्रिवर्णन, पंडित विश्वनाथ बाळापूरकर यांचा ज्ञानप्रबोध आणि पंडित नारायण व्यास वहाळिये यांचे ऋद्धिपूरवर्णन यांचा समावेश होतो. हे साती ग्रंथ परमार्गाच्या परंपरेने

मान्य केलेले आहेत. श्रीचक्रधर व श्रीगोविंदप्रभू या ईश्वरावतारांच्या लीळा त्यांच्या भक्तांकडून मिळवून म्हाइंभट्टांनी चक्रधरांच्या जीवनावरील लीळाचरित्र आणि गोविंदप्रभूंच्या जीवनावरील ऋद्धिपूरचरित्र हे चरित्रग्रंथ तयार केले आणि पंथीयांच्या नित्यस्मरणाची मोठी सोय केली. केसोबासांनी लीळाचरित्रातील काही लीळा निवडून त्या संस्कृत भाषेत पद्यबद्ध केल्या व आपला रत्नमालास्तोत्र ग्रंथ निर्माण केला. नागदेवांच्या जीवनावरील स्मृतिस्थळ हा चरित्रग्रंथ प्रथम नरेंद्र व परशराम बासांनी तयार केला, असे म्हणतात. पुढे त्याचे मालोबास व गुर्जर शिववास यांनी संस्करण केले केशवराज सूरी यांनी सिद्धान्तसूत्रपाठ आणि दृष्टान्तपाठ हे पंथीय तत्त्वज्ञान विशद करणारे ग्रंथ तयारे केले. श्रीचक्रधरांनी नित्यदिनचर्या सांगणारा छोटा पण महत्त्वाचा ग्रंथ पूजावसर हा वाङ्देववास यांचा. मुनिव्यासांनी श्रीचक्रपाणी, गोविंदप्रभू व चक्रधर यांच्या 'संबंधा'ने पवित्र झालेल्या स्थळांची स्थानपोथी लिहिली. डॉ. कोलते ह्यांच्या मते ते कर्तृत्व शंकास्पद आहे म्हाइंभट हे मराठीतील आद्य चरित्रकार मानले जातात. धवळे व मातृकी रुक्मिणीस्वयंवर रचणारी चक्रधरशिष्या महदाइसा ही आद्य मराठी कवियत्री होय. हयग्रीवाचार्य यांनी भागवताच्या दशम स्कंधावर गद्यराज हे निर्यमक श्लोकबद्ध काव्य लिहिले. पंथाच्या उत्कर्षकाळात निर्माण झालेल्या महत्त्वाच्या ग्रंथरचनेनंतर भाष्यग्रंथ व इतर प्रकारचे साहित्य लिहिले गेले. त्यात गुर्जर शिववासाने, चक्रधरांच्या वचनांवर संबंधिलेले लक्षणस्थळ, विचारस्थळ व आचारस्थळ हे ग्रंथ महत्त्वाचे होत. यांतील प्रत्येक स्थळावर पुढे अनेक भाष्ये किंवा बंद लिहिले गेले. त्यांत दत्तराज मराठे यांचा लक्षणबंद, वाईंदेशकरांचा विचारबंद विश्वनाथवास बीडकर यांचा आचारबंद विशेष महत्त्वाचे आहेत. स्थळ व बंद ग्रंथांनी चौदाव्या-पंधराव्या शतकांत मराठी गद्याचे दालन विशेष समृद्ध झाले आहे याच काळात मराठीचा पहिला व्याकरणग्रंथ पंडित भीष्माचार्यांनी लिहिला. चक्रधरांची वचने ज्या प्रसंगी निरूपिली गेली वर्णन करणारा, निरुक्तशेष ग्रंथ भीष्माचार्य वाइंदेशकर ह्यांनी तयार केला. तोही पंथीय वाङ्मयात महत्त्वाचा मानला जातो.

महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर हे स्वतः गुजराती भाषक असले, तरी ते मराठी भाषा अस्खलित बोलत. आपल्या तत्त्वज्ञानाचा मराठी या लोकभाषेत त्यांनी प्रचार केला. त्यांचा हा दृष्टिकोण पंथाचे आचार्य नागदेव यांनी कटाक्षाने आचरणात आणला. त्यामुळे केशिराजांसारख्या संस्कृतज्ञ शिष्यांकडून त्यांनी मराठी भाषेत ग्रंथरचना करवून घेतली (नको गा केशवदेया : येणें, माझिया स्वामीचा सामान्य परिवारू नागवैस की : किंवा 'तुमचा अस्मात् मी नेणे गा : मज श्रीचक्रधरे निरुपल्ली मऱ्हाटी : तियाचि पुसा :) (स्मृ. स्थ. १५, ६६). चक्रधर-नागदेवांच्या शिष्यवर्गात पारंपरिक संस्कृत पठडीत तयार झालेले शिष्य असल्याने त्यांची ग्रंथरचना संस्कृत वाङ्मयाच्या वळणावर गेली असून त्यांच्या भाषेवर संस्कृताचा मोठा प्रभाव आहे. या ग्रंथात प्रारंभी महाकाव्यसदृश सलग ग्रंथरचना झाली. पुढील काळात चौपद्या, धुवे, स्तोत्रे, आरत्या, धवळे, पदे अशी विपुल स्फुटरचनाही झाली. लक्ष्मण रत्नाकरासारख्या संस्कृत ग्रंथावरील बत्तीसलक्षणांची टीप यासारखे टीपग्रंथ लिहिले गेले. त्यामुळे सूत्रभाष्य, अर्थनिर्णयशास्त्र, व्याकरणशास्त्र, साहित्यशास्त्र यांची रचना मराठीच्या प्रारंभाकाळात करून महानुभावीयांनी मराठीची उपासनाच नव्हे, तर जोपासनाही केली. महानुभावीयांच्या या वैविध्यपूर्ण वाङ्मयाची विभागणी (१) चरित्रग्रंथ, (२) सूत्रग्रंथ, (३) साती (काव्य) ग्रंथ, (४) भाष्यग्रंथ, (५)

साधनग्रंथ, (६) तात्त्विक ग्रंथ, (७) गीता टीका, (८) आख्यानक काव्ये, (९) स्थलवर्णनपर ग्रंथ, (१०) इतिहासग्रंथ, (११) स्फुटरचना अशा प्रकारांत करता येईल.

भास्करभट हे पंथाचे आचार्य असताना, मुसलमानी आक्रमणाच्या काळात ते कोकणात जात असताना, लीळाचरित्र, ऋद्धिपूरचरित्र, स्थानपोथी इ. ग्रंथांच्या अधिकृत पोथ्या चोरांकडून लुबाडल्या गेल्या. त्यानंतर हिराइसा आदी अनेक शिष्यांकडून आपापल्या आठवणीप्रमाणे त्यांचे पुनर्लेखन करण्यात आले. ते करताना त्यांनी इतरांच्या 'वासना' ही नमूद केल्या. त्यामुळे या ग्रंथांत अनेक पाठभेद निर्माण झाले आणि पुढेपुढे त्यांत अधिकाधिक भर पडत गेली. काही आम्नायांनी सांकेतिक लिपीत आपले ग्रंथ निबद्ध केले. आपली ब्रह्मविद्या, धर्ममते भ्रष्ट होऊ नयेत म्हणून इतरांपासून गुप्त ठेवण्याची आणि पंथीय वाङ्मयाचे पावित्र्य राखण्याची भावना वाढीस लागून त्यासाठी ग्रंथ सांकेतिक लिपीत लिहिण्यास येऊ लागले. रवळो व्यासाने १३५३ मध्ये सकळ लिपी तयार केली आणि १३६३ मध्ये सुंदरी लिपी निघाली. त्यानंतर पारमांडल्य, वज्रलिपी, अंकलिपी इ. अनेक लिप्या तयार झाल्या असल्या, तरी बहुतेक ग्रंथ सकळ लिपीतच आढळतात. परशुराम आचार्यांच्या काळात निर्माण झालेल्या अनुयायांची नावे अशी : (१) कवीश्वर, (२) उपाध्ये, (३) पारिमांडल्य, (४) अमृते, (५) मदळसा, (६) कुमर, (७) यक्षदेव, (८) दामोदर, (९) हरिदेव, (१०) जयदेव, (११) साळकर, (१२) दिवाकर आणि (१३) महेश्वर. महानुभाव पंथाने प्रस्थापित आचारधर्मावर प्रहार करून एक नवा विचारप्रवाह निर्माण केला. चक्रधरांनी गीतेवरील भाष्याच्या स्वरूपात पारंपरिक पद्धतीने आपले विचार न मांडता स्वतंत्रपणे मांडले. श्रीकृष्ण हा पूर्णावतार मानून त्यांनी पंचकृष्णांखेरीज अन्य देवता क्षुद्र मानल्या. स्त्रीशूद्रादिकांना संन्यासाचा अधिकार देऊन मोक्षमार्ग सर्वांसाठी त्यांनी खुला केला. पंथीय तत्त्वविचार लोकभाषेत, मराठीत मांडले मराठी वाङ्मय समृद्ध झाले; परंतु सामान्यांच्या बौद्धिक पातळीचा विचार न करता या पंथातील संस्कृतज्ञ ग्रंथकारांनी लेखन केल्यामुळे त्याच्या प्रसारास मर्यादा पडल्या. महानुभाव पंथाच्या वैदिक वा अवैदिक स्वरूपाबाबत वाद आहे. तो वेदानुयायी किंवा वेदविरोधी दोन्ही नसून त्याचे स्वतंत्र रूप आहे. असेही काही मानतात. त्यांचे वेदविरोधकत्व सांगताना (१) वेद हे कर्मरहाटीचे शास्त्र म्हणून त्याज्य आहे, हे चक्रधरांचे मत, (२) देवतांची उपासना परमेश्वरप्राप्तीच्या दृष्टीने अप्रमाण, (३) चक्रधर वचने हीच महानुभावांची श्रुती असून वेदवचने ते प्रमाण मानीत नाहीत म्हणून वगैरे.

महानुभाव ह्या प्रमुख संप्रदायामध्ये महानुभाव वारकरी व रामदासी हे तीन वैष्णव पंथ आहेत.

'सूत्रपाठ' या ग्रंथास महानुभावांचा वेद असे संबोधले जाते. त्यातून महानुभावांचे सारे तत्त्वज्ञान विशद झाले आहे. महानुभाव जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या वस्तू मुख्य व नित्य अशा मानतात. त्यांच्या मते, या चार वस्तू स्वतंत्र, नित्य, अनादि व अनंत आहेत. जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर यांचे परस्परांशी किंवा सर्वांशी कधीच ऐक्य साधले जात नाही, असे हा पंथ मानतो. म्हणूनच त्यास 'द्वैती पंथ' म्हणतात. 'देवता या नित्यबद्ध आहेत, जीव बद्धमुक्त आहेत, परमेश्वर नित्यमुक्त आहे व प्रपंच अनित्य आहे' असे या तत्त्वज्ञानाचे सूत्र आहे.

**जीव :** जीव बद्धमुक्त म्हणजे बद्ध असूनही मुक्तीस पात्र असणारा असा आहे. त्याला मायेचे बंधन आहे. तो मूलतः स्फटिकाप्रमाणे शुभ्र आहे पण अविद्येमुळे त्याला काळसरपणा प्राप्त झालेला आहे

तांदळाच्या दाण्यावर जसे पाच पदर असतात, तसा जीव हा 'पाच पिशीं'नी युक्त असतो. अनादि, अविद्या, अन्यथाज्ञान, जीवत्व व आदिमळ या त्या पाच पिशी होत. यासाठी उद्धवगीतेत मडक्याच्या उतरंडीचा समर्पक दृष्टान्त दिला आहे. यांतील सर्वांत तळाचे मडके अविद्या हे आहे. हे अविद्येनेच मडके फोडले म्हणजे वरची मडकी आपोआपच फुटतील.

**प्रपंच :** प्रपंचास महानुभाव अनित्य मानतात. कारणप्रपंच व कार्यप्रपंच असे त्यांनी प्रपंचाचे दोन भाग केले आहेत. अव्यक्त असणारी पंचमहाभूते व त्रिगुणी म्हणजेच कारणप्रपंच होय. कार्यप्रपंचाची निर्मिती पृथ्वी, आप, तेज, वायू, आकाश ही पंचमहाभूते व सत्त्व, रज, तम हे त्रिगुण यांच्यातून झाली आहे.

**देवता :** देवतांना महानुभावांनी गौण मानले आहे. परमेश्वर हा नित्यमुक्त असल्यामुळेच तो जीवाचा उद्धार करू शकतो. (परमेश्वर एकु सोडविता) परमेश्वराचे ज्ञान झाले म्हणजे, अथवा भक्ती केली म्हणजे, जीवाला मोक्ष मिळतो. मोक्ष परमेश्वराकडूनच मिळू शकतो. देवतांकडून नाही. देवतांचे कार्य सृष्टीतील जिवांना त्यांच्या कर्मांची सुखदु:खात्मक फळे देणे हे होय.

वेदान्तातील कल्पनेच्या उलट महानुभावीय ईश्वरास प्रमुख स्थान देतात आणि ब्रह्मास एक भाग मानतात. त्यांच्या मते, ईश्वर हा अनादि, नित्य, अव्यक्त, स्वयंप्रकाशी, सर्वव्यापी, ज्ञानमय, आनंदमय, सर्वसाक्षी व सर्वकर्ता असा आहे. जीवाच्या उद्धारासाठी परमेश्वर मनुष्यदेह धारण करून अवतार घेतो. ईश्वराचे स्वरूप ज्ञानामुळे ओळखता येते. शब्दज्ञान, सामान्यज्ञान, अपरोक्षज्ञान व विशेषज्ञान असे या ज्ञानाचे चार प्रकार आहेत. ज्ञानमार्ग आणि भक्तिमार्ग ही मोक्षप्राप्तीची दोन साधने आहेत.

**पंचकृष्ण :-** महानुभाव चार युगांचे चार अवतार मानतात. कृतयुगात हंसावतार, त्रेतायुगात दत्तावतार, द्वापारयुगात कृष्णावतार आणि कलियुगात चक्रधरावतार असे हे अवतार होत. महानुभावांनी फक्त पाचच मूर्ती मानून त्यांची पूजा केली आहे. हे पाच अवतार हेच त्यांचे पंचकृष्ण होत. गुरूवर प्रीती करावी पण त्याला परमेश्वर समजू नये असे महानुभाव मानतात. हा पंथ वेदांबद्दल आदर बाळगणारा असला तरी वेदांना प्रमाण मानणारा नाही. महानुभाव पंचकृष्णांच्या वचनांनाच प्रमाण मानतात.

व्यक्तीचे श्रेष्ठत्व जन्माने नव्हे, तर त्याच्यातील तत्त्वज्ञानातून ठरते, असे सांगणारा महानुभाव हा एकच पंथ असून, येथे सर्व माणसे समान आहेत, असे काही विद्वान मानतात. त्यांच्या मते दंभ निर्माण होतात तेव्हा धर्मात अपप्रवृत्ती येतात. प्रत्यक्ष असणे व दिसणे यातील भेद संपतो, तेव्हा दंभ संपतो. त्याचवेळी समाजात परिवर्तन घडू शकते. महानुभाव पंथ हा सर्वांना सामावून घेणारा पंथ आहे. येथे सर्व समान आहेत. त्यामुळे सर्व जाती-धर्मांचे लोक येथे दिसतात. येथे जातिभेद नाही, तर केवळ तत्त्वज्ञान आहे. धर्मासाठी आम्ही नाही, तर धर्म आमच्यासाठी आहे. तो साध्य नाही, तर साधन आहे. हीच पंथाची शिकवण आहे. इ.स. १२व्या शतकात मानवतेला लागलेला भेदाभेदांचा कलंक दूर करण्याचा प्रयत्न चक्रधर स्वामींनी महानुभाव पंथाच्या माध्यमातून केला. महानुभाव संप्रदाय हा अहिंसावादी असून अहिंसा परमो धर्मः हे त्याचे एक महत्त्वाचे तत्त्व आहे

**चक्रधर स्वामी सामाजिक समतेचे आद्यप्रवर्तक :-** बाराव्या शतकात महानुभाव पंथाचे प्रवर्तक श्री चक्रधर स्वामी यांनी केलेल्या सामाजिक परिवर्तनाने धर्मशास्त्र व साहित्याची दारे समाजातील

उपेक्षितांसाठी खुली झाली. त्यामुळे श्री चक्रधर स्वामींकडेच सामाजिक समतेच्या आद्यप्रवर्तकाचा पहिला मान जातो.

**४.३) वारकरी संप्रदाय** :- वैदिक धर्माचे विकसित रूप म्हणजे हा संप्रदाय होय. महाराष्ट्रातील एक अत्यंत लोकप्रिय भक्तिसंप्रदाय. 'वारी करणारा' ह्या अर्थाने 'वारकरी' हा शब्द वापरण्यात आलेला आहे. 'वारी' ह्या शव्दाचा अर्थ यात्रा, नियमित फेरी, व्रत, येरझार असा दिला जातो, हे लक्षात घेतल्यास आपल्या उपास्य देवतेच्या-मग ती कोणतीही असो-यात्रेला जो नियमितपणे, एक व्रत म्हणून जातो, तो 'वारकरी' असे म्हणता येईल. येरझारांमध्ये जी वारंवारता आहे, तीही येथे अभिप्रेत आहे. तथापि वारकरी संप्रदाय म्हणजे पंढरपूरच्या विठोबाशी संबंधित असलेला वारकरी संप्रदाय, असाच अर्थ घेतला जातो. ह्याचे मुख्य कारण म्हणजे विठोबा वा विठ्ठल वा पांडुरंग ह्या आपल्या उपास्य दैवताच्या वारीला ह्या संप्रदायाने जितके महत्त्व दिले आहे, तितके अन्य कोणत्याही पंथाने त्याच्या उपास्य दैवताच्या वारीला दिलेले नाही. वारकरी संप्रदायाच्या आचारधर्मानुसार संप्रदायाच्या अनुयायांनी प्रतिवर्षी दोन वेळा-म्हणजे आषाढ शुद्ध एकादशीस व कार्तिक शुद्ध एकादशीसश्रीविठ्ठलाची वारी पंढरपूर क्षेत्री जाऊन केली पाहिजे. शुद्ध माघी एकादशी व शुद्ध चैत्री एकादशी ह्या दोन दिवशीही पंढरपूर येथे मोठ्या संख्येने वारकरी जमतात. तथापि आषाढी एकादशी आणि कार्तिकी एकादशी ह्या दोन वाऱ्या प्रमुख मानल्या जातात. त्यांतही आषाढीला महत्त्व विशेष आहे. ज्यांना वर्षातून एकदाच-म्हणजे आषाढीला किंवा कार्तिकीला-येणे शक्य असते, त्यांनी तसे केले तरी चालते परंतु प्रतिवर्षी किमान एकदा तरी वारी करणे, ही वारकऱ्यांची मुख्य साधना होय. श्रीज्ञानदेवांनी समाधी घेतल्यानंतर प्रतिवर्षी कार्तिक वद्य एकादशीस वारकरी संप्रदायाचे अनुयायी आळंदीलाही नियमाने जमू लागले. प्रत्येक वारकऱ्याच्या गळ्यात तुळशीच्या १०८ मण्यांची माळ असते. इतर अनेक धर्मपंथांत माळेला स्मरणी म्हणून महत्त्व आहेच पण वारकरी संप्रदायात ही तुळशीच्या मण्यांची माळ घातल्याखेरीज कोणाला वारकरी होताच येत नाही. माळ घालणे, म्हणजे एक नवा आध्यात्मिक जन्म घेणे, असे मानले जाते.

वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत असलेल्या विठ्ठलाचे निर्देश श्रुतिस्मृतिपुराणांत आलेले नाहीत. विष्णुसहस्रनामांत तसेच विष्णुच्या मानल्या गेलेल्या चोवीस अवतारांत विठ्ठलाचा अंतर्भाव झालेला दिसत नाही. तथापि विठ्ठलाला इसवी सनाच्या अकराव्या-बाराव्या शतकांपासून असाधारण अशी वैष्णव प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. विष्णूपासून विठ्ठल हे नाव बनले, असे मत काही अभ्यासकांनी व्यक्त केलेले आहे.

**ग्रंथ:-** गीता,भागवतपुराण,ज्ञानेश्वरी, ज्ञानेश्वरकृत हरिपाठ, संस्कृतातील भागवतपुराणाच्या एकादश स्कंधावरील संत एकनाथकृत एकनाथी भागवत, भागवतपुराणाच्या द्वितीय स्कंधाच्या नवव्या अध्यायातील ३२ ते ३५ अशा चार श्लोकांवर एकनाथांनीच लिहिलेले चतुःश्लोकी भागवत, एकनाथांचा हरिपाठ आणि तुकारामांची अभंगगाथा, हे ग्रंथ वारकरी संप्रदायाला प्रमाणभूत होत. त्यांतही ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि तुकोबांची अभंगगाथा, ही वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी मानली जाते. ह्या संप्रदायातील इतर संतांच्या रचनाही वारकरी अर्थातच आदराने वाचतात.

प्रत्येक वारकरी पंढरपूरची वारी वर्षातून किमान एकदा तरी करतोच, तथापि ज्ञानदेवांनी समाधी घेतल्यानंतर कार्तिक वद्य एकादशीसही वारकरी आळंदीला जाऊ लागले हा उल्लेख वर आलाच आहे. संत नामदेवांच्या (१२७० - १३५०) काळातच ही आळंदीवारी सुरू झाली. सासवड, त्र्यंबकेश्वर, एदलाबाद, पैठण, देहू, पिंपळनेर, आळबेल्हे इ. ठिकाणीही वारकऱ्यांची यात्रा भरते. त्या त्या स्थळी झालेल्या विशिष्ट संतांच्या वास्तव्यामुळे ही ठिकाणे पवित्र मानली गेली आहेत. तथापि विठ्ठलाच्या सर्व वाऱ्या शुद्ध पक्षातल्या असून भक्तांशी संबंधित असलेल्या स्थानी होणाऱ्या वाऱ्या वद्य पक्षातल्या आहेत

वारीच्या कार्यक्रमात कीर्तने होत असतात. श्रोत्यांच्या मनांत भक्तिरसाचा परिपोष करणे, तसेच संप्रदायाचा प्रसार करणे हे कीर्तनाचे महत्त्वाचे हेतू आहेत. थोर संत आणि वारकरी नामदेव हे आद्य कीर्तनकार मानले जातात. 'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ' ही नामदेवांची भूमिका होती. भजनकीर्तनांच्या योगे विठ्ठलाची किर्ती त्यांनी भारतात अनेक ठिकाणी हिंडून पोहोचविली. सु.५४ वर्षे ते पंथप्रचारासाठी झटले. पंजाबात तर अनेकांनी त्यांचे शिष्यत्व स्वीकारले. नामदेवांनी हिंदी भाषेत रचलेली ६१ पदे शिखांच्या ग्रंथसाहिबात अंतर्भूत आहेत.

संत बहिणाबाईनी (१६२८-१७००) ह्या आपल्या प्रसिद्ध अभंगात म्हटले आहे,

**संतकृपा जाली । इमारत फळा आली ।**
**ज्ञानदेवें रचिला पाया । उभारिले देवालया ।**
**नामा तयाचा किंकर । तेणे रचिले तें आवार ।**
**जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ।**
**तुका जालासे कळस । भजन करा सावकाश ।**

विठ्ठलभक्तिने भारलेले विविध जातींचे लोक विठ्ठलभक्तिने भारा वलेल्या रचना करू लागले. गोरा कुंभार (१२६७-१३१७), सावतामाळी (१२५०-९५), नरहारी सोनार (मृ.१३१३), चोखामेळा (मृ.१३३८), सेना न्हावी (तेरावे शतक) इ. संतांची एक मालिकाच उभी राहिली. वेगवेगळ्या व्यवसायांतले हे संत होते आणि त्यांनी आपल्या अभंगरचनेसाठी आपापल्या व्यवसायातली परिभाषा वापरली वा आपापल्या व्यवसायांचे संदर्भ दिले. उदा,

**केशवाचे ध्यान धरूनि अंतरी । मृत्तिकेमाझारी नाचतसे**
**विठ्ठलाचे नाम स्मरे वेळोवेळ । नेत्री वाहे जळ सद्गदीत**
**कुलालाचे वंशी जन्मले शरीर । तो गोरा कुंभार हरिभक्त**
**(गोराकुंभार)**

**कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी**
**लसूण मिरची कोथिंबिरी । अवघा झाला माझा हरी**
**मोट नाडा विहीर दोरी । अवघी व्यापिली पंढरी**

**सांवता म्हणे केला मळा । विठ्ठल पायी गोविला गळा**
**(सांवता माळी)**

**देवा तुझा मी सोनार । तुझे नामाचा व्यवहार**
**देह बागेसरी जाणे । अंतरात्मा नाम सोने**
**त्रिगुणाची करूनी मूस । आत ओतिला ब्रह्मरस**
**जीव शीव करूनी फुंकी । रात्रंदिवस ठोकाठोकी**
**विवेक हातवडा घेऊन । काम क्रोध केला चुर्ण**
**मनबुद्धिची कातरी । रामनाम सोने चोरी**
**ज्ञान ताजवा घेउन हाती। दोन्ही अक्षरे जोखिती**
**खांद्या वाहोनी पोतडी । उतरला पैलथडी**
**नरहरी सोनार हरीचा दास । भजन करी रात्रंदिवस**
**(नरहरी सोनार)**

**आम्ही वारीक वारीक । करू हजामत बारीक**
**विवेक दर्पण आयना दाऊ । वैराग्य चिमटा हालऊ**
**उदक शांती डोई घोळू । अहंकाराची शेंडी पिळू**
**भावार्थाच्या बगला झाडू । काम क्रोध नखे काढू**
**चौवर्णा देऊनी हात । सेना राहिला निवांत**
**(सेना न्हावी)**

संतश्रेष्ट चोखामेळा जातीने महार. त्यांचे सारे कुटुंब-पत्नी सोयरा, बहिण निर्मला, मुलगा कर्ममेळा व मेहूणा बंका-विठ्ठलभक्त होते. तथापि चोखामेळा ह्यांच्या अभंगांतून सामाजिक विषमतेमुळे त्यांना बसत असलेले चटके स्पष्टपणे दिसुन येतात. उदा.,

**हीन याती माझी देवा । कैसी घडे तुझी सेवा ।**
**मज दूर दूर हो म्हणती । तुज भेटू कवण्यारीती ।।**

प्रत्येक माणसाच्या देहात जन्मापासून मरेपर्यंत विटाळच साचून राहिलेला असताना ‘सोवळा वोवळा तो कोण?’ आणि ‘विटाळापरते आहे कोण ?’ असा मार्मिक प्रश्न त्यांनी एका अभंगात विचारला आहे.’आत्मा तो निर्मळ शुद्धबुद्ध । देहाचा विटाळ देहीच निर्धारी । म्हणतसे महारी चोखियाची ।।’ असे उद्‌गार चोखामेळ्यांच्या पत्नी सोयराबाई ह्यां नीही एका अभंगात काढले आहेत.

वारकरी संतांनी आध्यात्मिक समता निश्चितपणे प्रस्थापित केली. देवाला सर्व भक्त सारखे, हीच शिकवण दिली. 'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ।।' ह्या तुकोबांच्या उक्तीमध्ये ही अभेदभावाची भूमिकाच स्पष्ट झालेली आहे.

श्रीज्ञानदेवांची गुरूपरंपरा जशी नाथपंथाची, तशीच एकनाथांची दत्तसंप्रदायाची होती. त्यांचे गुरू जनार्दनस्वामी हे दत्तोपासक होते, परंतु विठ्ठलभक्तीची कौटुंबिक परंपराही त्यांच्या पाठीशी होती. एकनाथांचे पणजे संत भानुदास (१४४५-१५५३) हे विठ्ठलभक्त होते. 'आमुचिये कुळी पंढरीचा नेम । मुखी सदा नाम विठोबाचे ।। ' असे उद्गार त्यांनी आपल्या एका अभंगात काढले आहेत. भानुदासांच्या बाबतीत एक आख्यायिका अशी आहे, की विजयानगरचा राजा कृष्णराय ह्याने पंढरपूरची विठ्ठलमूर्ती विजयानगरला नेली होती परंतु संत भानुदासांनी ती परत आणली. स्वतः एकनाथांनी भानुदासांविषयी जी माहिती दिली आहे, तीत विजयानगरहून विठ्ठलमूर्ती परत आणल्याची हकिकत नाही, पण भानुदासांच्या जवळजवळ समकालीन असा राजा कृष्णराय ह्याची वृत्ती निरनिराळ्या ठिकाणांहून देवमूर्ती आणून त्यांची विजयानगरात स्थापना करण्याची होती, ह्याबद्दल विपुल पुरावा मिळतो. कदचित भानुदासांना त्याने त्या मूर्तीसारखीच दुसरी मूर्ती तयार करुन दिली असणे शक्य आहे असे मत ग. ह. खरे ह्यांच्यासारख्या इतिहास संशोधकानी व्यक्त केले आहे.

विठ्ठलभक्तीची पार्श्वभूमी पाठीशी असल्यामुळे एकनाथांच्या हातून वारकरी संप्रदायाच्या संदर्भातही भरीव कामगिरी घडून आली. गीतेचा अर्थ मराठीत सांगून तो सर्वसामान्यांपर्यं त पोहोचविण्याची कामगिरी ज्ञानेश्वरांनी केली. त्याचप्रमाणे नाथांनी भागवतपुराण मराठीत आणले

**हे देशभाषा वाणी । उघडिली परमार्थाची खाणी ।**
**हे टीका तरी मराठी । ज्ञानदाने होईल लाठी ।।**

असे उद्गार नाथांनी एकनाथी भागवतात काढलेले आहेत. त्याचप्रमाणे 'संस्कृत भाषा देवे केली । तरी प्राकृत काय चोरापासोनी झाली?' असा सवालही त्यांनी विचारला आहे. तथापि एकनाथांनी संस्कृतचा अनादर कधीच केला नाही. उलट त्या भाषेतील शब्दांचे ऐश्वर्य मराठीला श्रीमंत आणि भारदस्त करण्यासाठी त्यांनी उपयोगात आणले कटुता आणणारा अभिनिवेश न बाळगता नव्याजुन्यांचा मेळ घालण्याची जी शक्ती नाथांच्या ठायी होती, तिच्यामुळेच सनातन्यांना न दुखविता ते त्यांच्या सद्भावनेस हात घालू शकले.

लोकाभिमुखता हे वारकरी संप्रदायाचे एक फार मोठे वैशिष्टय होय. वारकरी संप्रदायाच्या इमारतीचे वर्णन करीत असताना संत बहिणाबाईंनी 'तुका झालासे कळस ' असे सार्थ उद्गार काढले आहेत. कारण भागवत धर्माच्या दीर्घ परंपरेची परिपूर्ती तुकारामांच्या जीवनात आणि साहित्यात झालेली होती. तुकारामांच्या जीवनाचे एक लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे ते हळूहळू आध्यात्मिक प्रवासाचा एकेक टप्पा पार करीत 'अणुरणीया थोकडा । तुका आकाशाएवढा।। ' अशी प्रचीती घेण्याइतके मोठे झाले. अभंगाच्या द्वारे आपल्या अनुभवांचे खडे बोल ऐकवीत त्यांनी सामान्यांना परमार्थबोध केला. त्यांच्या अभंगातून वारकरी संप्रदायाचीच भूमिका व्यक्त झालेली आहे :

**भरणी आली मुक्त पेठा । करा लाटा व्यापार ।**
**उधार घ्यारे उधार घ्यारे। अवघे या रे जातीचे ।**
**येथे पंक्ति भेद नाही। मोठे काही लहान ।**
**तुका म्हणे माल घ्यावा । मुद्दल भावा जतन ।।**

उत्तम चारित्र्य, धर्मनिष्ठा, भूतदया, सदाचार आणि नीती ह्यांचाच वारकरी संप्रदायाच्या आचारधर्मात अंतर्भाव आहे. तुकोबांनी आपल्या अभंगातून तेच संस्कार जनमानसावर केले. तुकोबांच्या अनुयायांत अनेक जातींचे लोक होते आणि त्यांचे शिष्य म्हणविणाऱ्या प्रमुख सोळाजणांत नऊ ब्राह्मण होते, ही बाबही लक्षणीय आहे.

निळोबा पिपंळनेरकर (मृ. सु. १७५३) हे तुकारामांचे परमभक्त होत. ह्यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील शिरूरचा, परंतु अहमदनगर जिल्ह्यातील पिंपळनेर ह्या गावी ते स्थायिक झाल्यामुळे पिंपळनेरकर म्हणून ओळखले जाऊ लागले. तुकारामांना त्यानी प्रत्यक्ष पाहिले नव्हते. परंतु त्यानी तुकोबांची परंपरा पुढे चालविली. त्यानी लिहिलेल्या अभंगां ची संख्या सु. १,३०० भरेल. वारकरी पंथातले शेवटचे अधिकारी संतकवी म्हणून ते मानले जातात.

**तत्वज्ञान** :- वारकरी संप्रदाय हा मूलतः भक्तिपंथ आहे आणि अद्वैत तत्त्वज्ञानाचा वाहक आहे. जे तत्त्वज्ञान वेदातील उपनिषदांमध्ये आहे तेच व्यासांनी मांडले,त्यावर भाष्यकार आदि शंकराचार्यांनी भाष्य केले, तेच तत्त्वज्ञान संत ज्ञानदेवांनी आपल्या मराठी गीताभाष्यात, चांगदेव पासष्टीत व अमृतानुभव ग्रंथात मांडले आहेते म्हणतात

**इये मराठीचिये नागरी । ब्रम्हविद्येचा सुकाळू करी ।**
**घेणे देणे सुखाची वरी । हो देईया जगा ।।**

वारकरी संप्रदायाला स्वसंवेद्य आत्मतत्वाचे अद्वैत मान्य होते.भक्ती हा केवळ त्या अद्वैताचा अनुभव घेण्याचा मार्ग होता. यासोबतच भक्तीसुखाचा सोहळा त्यांना हवा होता. 'मोक्ष तुमचा देवा । दुर्लक्ष तो तुम्ही ठेवा । मज भक्तीची आवडी ।' असे तुकारामांनी म्हटले आहे. हे आत्मतत्त्व एक असले, तरी क्रीडेसाठी देव आणि देवी या स्वरूपात ते आविष्कृत होते. जगताची ही मातापितरे आवडीमुळे एकमेकांत मिळत असतात. शंकराचार्यांच्या अद्वैत वेदान्तात मानले आहे, की सच्चिदानंद-स्वरूपी ब्रह्मास मायेची उपाधी आहे आणि जगत् हे त्या मायेचे कार्य आहे

वारकरी पंथाने देशी भाषेला जे महत्त्व दिले, ते महानुभाव पंथीयांनीही दिले होते. बौद्ध, जैन, लिंगायत ह्यांनीही देशी भाषेचा पुरस्कार केला होता. तथापि आपल्या विचारांना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वारकरी पंथीयांनी मराठी भाषेच्या जोडीला स्वतःचे असे एक तंत्र उपयोगात आणले. श्रोत्यांबद्दलचा आदरभाव त्यांनी कायम मनात बाळगला. ज्ञानेश्वरी हे गीतेवरील भाष्य असले, तरी तो एक श्रोतृसंवादही आहे. श्रोत्यांमुळे आपले वक्तृत्व फुलते हीच भूमिका ज्ञानेश्वर घेऊन आहेत. 'प्रभू तुम्ही महेशाचिया मूर्ती । आणि मी दुबळा अर्चितुसे भक्ती असे त्यांनी एके ठिकाणी श्रोत्यांना उद्देशून म्हटले आहे. अन्य वारकरी संतांनीही श्रोत्यांशी समरस होण्यात धन्यता मानली. त्यामुळे इतर पंथीयांच्या तुलनेत वारकरी संतसाहित्य लोकांपर्यंत अधिक प्रमाणात पोहोचले. ज्ञानेश्वरी गावोगावी अनेकांपर्यंत

पोहोचली होती. वारकरी पंथाची ही सारी वैशिष्ट्ये त्या पंथाला जे सर्व थरांतील संतांचे असामान्य आध्यात्मिक नेतृत्व वेळोवेळी लाभत गेले त्यातून निर्माण झाली

**४.४) दत्त संप्रदाय** :- दत्तात्रेयास उपास्यदैवत मानणाऱ्यांचा धर्मपंथ. पंधराव्या शतकात नरसिंह सरस्वती नावाच्या महाराष्ट्रीय विभूतीमुळे दत्तोपासनेचा संप्रदाय बनला. पुराणे व अर्वाचीन पाच उपनिषदांतून दत्तास वर्णाश्रमधर्माची प्रतिष्ठा राखणारा, गुरुतत्त्वाचा आदर्श आणि योगाचा उपदेशक म्हटले आहे. दत्तात्रेय हा अवधूत जोगी आहे म्हणून नाथ संप्रदायातही त्याची उपासना होते. नाथ संप्रदायास त्यावरूनच 'अवधूत' पंथ असे म्हटले जाते. नाथ संप्रदायात दत्त व गोरखनाथ यांच्या संबंधाबाबतच्या अद्भुत कथा रूढ आहेत. महानुभाव पंथाचे आदिकारण दत्त होय, असे चक्रधरांनी म्हटले आहे. त्यांचा दत्तात्रेय त्रिमुखी नसून तो एकमुखी, चतुर्भुज आहे. तो परब्रह्माचा अवतार आहे. सूत्रपाठ, लीळाचरित्र इ. महानुभव ग्रंथांतूनही दत्तमाहात्म्य वर्णिले आहे. वारकरी संप्रदायातील संतांनी तसेच आनंद संप्रदायी लोकांनी दत्तात्रेयाविषयी आदर व्यक्त केला आहे. दत्तात्रेयाने प्रवर्तिलेल्या चैतन्य संप्रदायाच्या एका शाखेत एकोणिसाव्या शतकात भैरव अवधूत नावाचे एक सत्पुरुष झाले. त्यांनी आपल्या ज्ञानसागरनामक ग्रंथात दत्तोपासनेचा प्रचार केला आहे.

दत्तोपासना पूर्वीपासून होत असली, तरी तिला संप्रदायाचे स्वरूप नरसिंह सरस्वतींच्या प्रभावामुळेच आले. श्रीपाद श्रीवल्लभ हे दत्तात्रेयाचे पहिले अवतार होत. तर नरसिंह सरस्वती हे दुसरे अवतार मानले जातात. जनार्दन स्वामी, एकनाथ, दासोपंत, मुक्तेश्वर, निरंजन रघुनाथ, माणिक प्रभू, अक्कलकोटकर स्वामी, वासुदेवानंद सरस्वती इ. महापुरुषांनी संप्रदायाची परंपरा चालू ठेवली. आजही अनेक दत्तोपासक महाराष्ट्रात आढळतात.

दत्तात्रेय हा महायोगी असल्याने योगमार्गास पंथात प्राधान्य मिळाले. महाराष्ट्रातील बहुतेक योगमार्गी दत्तोपासकच होते. या संप्रदायात शैव आणि वैष्णव तसेच हिंदू व मुसलमान यांच्यात समन्वय साधला आहे. माणिक प्रभूसारख्यांनी समन्वयवादी विचार मांडले असले, तरी या संप्रदायातील अवतारी पुरुषांनी वर्णाश्रमधर्मावरच जोर दिला आहे. दत्तमाहात्म्य व दत्तप्रबोध ह्या ग्रंथांत ह्या संप्रदायाचे तत्त्वज्ञान आले आहे. गुरुचरित्रात संप्रदायाचा आचारधर्म सांगितला आहे. अवधूतगीता, गुरुगीता व जीवन्मुक्तगीता ह्या ग्रंथांतून संप्रदायाच्या सिद्धांतांचे विवरण आढळते. पूजोपचारांसाठी मूर्तीऐवजी पादुका प्रशस्त मानल्या आहेत. औदुंबर, नरसोबाची वाडी व गाणगापूर ह्या क्षेत्री दत्तात्रेयाच्या पादुकांची स्थापना केलेली आहे. पांचाळेश्वर, नरसोबाची वाडी, माहूर, गाणगापूर, लाड कारंजे, कुरुगड्डी, गिरनार ही या संप्रदायाची प्रमुख क्षेत्रे होत. पंथाचा प्रसार महाराष्ट्राइतका अन्यत्र आढळत नाही. नरसिंह सरस्वतींचा निवास गाणगापूरला झाल्यामुळे कर्नाटकात दत्त संप्रदायाचा विपुल प्रसार झाला मराठी गुरुचरित्र लिहिणारा गृहस्थ हा कानडी होता. आंध्रामधल्या दत्त संप्रदायाची माहिती वेंकटराव यांनी आपल्या लेखात दिली आहे. या संप्रदायात मान्यता पावलेले अनेक ग्रंथ तेलगू भाषेत लिहिले गेले आहेत. सौराष्ट्रात गिरनार येथे दत्तोपासनेची प्रेरणा घेतलेला बाबा किनराम अघोरी या नावाचा एक सत्पुरुष अठराव्या शतकाच्या आरंभी होऊन गेला. गिरनार येथे मला दत्तात्रेयाचा साक्षात्कार झाला, असे त्याने आपल्या विवेकसार नावाच्या ग्रंथात लिहिले आहे.

श्री दत्तात्रय भारतीय संस्कृतीतील प्राचीन देवता आहे. श्री दत्त उपासना ही प्रामुख्याने महाराष्ट्रातच गेली हजार बाराशे वर्षे अव्याहतपणे चालत आलेली आहे. श्री दत्त उपासना ही शैव/ वैष्णव / शाक्त या तिन्ही संप्रदायात दिसून येते. तसेच महानुभवी संप्रदाय, नाथ संप्रदाय, वारकरी संप्रदयामध्ये प्रामुख्याने श्री दत्त उपासना विशेषत्वाने / प्रकर्षाने चालत आलेली आहे. महाराष्ट्रात श्री दत्त संप्रदाय गेली पाच-सहाशे वर्षापासून चालत आलेला असून, हिंदू / मुसलमानांचा यात समावेश दिसून येतो.

दत्तात्रेय देवतेचा उल्लेख पुराणात, महाभारतात आढळून येतो. दत्तात्रेयांचा जन्म अत्रिवंश कुळात ब्रम्हा, विष्णू, महेश यांच्या आशीर्वादाने झालेला असून, याचा उल्लेख मार्कंडेय पुराणात प्रामुख्याने आलेला आहे. अत्रिऋषींनी ऋक्ष पर्वतावर पुत्र प्राप्तीसाठी घोर तपश्चर्या केली होती असा उल्लेख ब्रम्ह पुराणात दिसून येतो. परंतु श्री नारदाने केलेल्या अनुसूयेच्या सतीत्वाच्या गौरवामुळे ब्रम्हा - विष्णू - महेश भगवानांच्या पत्नीमध्ये अनुसुयेच्या सतीत्वाबद्दल द्वेष निर्माण झाला. अनुसुयेचे सत्त्व हरण करण्यासाठी देवी लक्ष्मी, पार्वती, सरस्वती नी श्री ब्रम्हा - विष्णू - महेश यांना अत्रिऋषींच्या आश्रमात पाठविले. सत्त्व हरण करणेसाठी आलेल्या भगवान ब्रम्हा, विष्णू , महेश यांनी अनुसूयेला सांगितले की, ‘‘तू विवस्त्र होऊन भोजन वाढीत असशील तर अतिथी म्हणून भोजन करू’’ आश्रमात तर अत्रि ऋषी नव्हते. अतिथींनी तर भोजन स्वीकारले पाहिजे अशा दुहेरी संकटात अनुसूया देवी अडकल्या अतिथींची भोजनाची अट अनुसूया मातेने स्वीकारून श्री अत्रि ऋषिंचे स्मरण करून या तिन्ही अतिथी देवावर तीर्थ शिंपडले. त्याबरोबर हे तिन्ही देव (ब्रम्हा-विष्णू-महेश) लहान बाळे
झाली. त्यांना दूध पाजून तृप्त केले.

इकडे आपल्या पतींची वाट पाहून श्री देवी लक्ष्मी / पार्वती / सरस्वती अत्रि ऋषिंच्या आश्रमात आल्या. पाहतात तो आपले पती लहान बाळे झालेली असून, पाळण्यात झोपलेली आहेत. त्यांना ओळखणेही कर्म कठीण आहे. अनुसूयेचे सतीत्व/श्रेष्ठत्व मान्य करून त्या तिन्ही देवी अनुसूयेला शरण गेल्या व आपल्या पतींना देवांना पूर्ववत रूप देण्याविषयी विनंती केली. तिन्ही देवांच्या भार्यांनी केलेल्या विनंतीला मान देवून अत्रि ऋषिंचे स्मरण करून पुन्हा तीर्थ शिंपडून अनुसूयेने तिन्ही देवांना पुन्हा पूर्वरूप दिले. पूर्वरूप प्राप्त झाल्यावर तिन्ही देवांनी / देवींनी अनुसूयेची प्रशंसा केली / सतीत्त्वाचा उच्च गौरव केला व वर मागणेस सांगितला.यावर अनुसूयेने या तिन्ही देवांना (ब्रम्हा-विष्णू-महेश) आपल्या पोटी अवतार घेणेबाबत वर मागितला. या वरानेच भगवान ब्रम्हा-विष्णू-महेश यांनी अनुसूया देवीच्या पोटी जन्म घेतला. अवतार श्री दत्त अवतार चरित्राबाबतीत अनेक वेगवेगळ्या कथा पुराणातून दिसून येतात. परंतु वरील कथाच सर्व मान्य झालेली आहे. भगवान दत्तात्रेयांनी भगवान शंकराची आराधना करून ब्रम्हज्ञान प्राप्त केले म्हणून नाथ संप्रदायात श्री दत्तात्रेयांची आराधना मुख्यत: दिसून येते. तसेच भगवान दत्तात्रेयांनी चोवीस गुरू केल्याचे आढळून येते. या चोवीस गुरूकडून वेगवेगळे गुण घेतले असून, या चोवीस गुणातच त्यांना ‘‘जग संपूर्ण गुरू दिसे’’ ही भावना निर्माण झालेली दिसून येते. हे चोवीस गुण भगवान दत्तात्रयांनी/अवधूतांनी घेतलेले आहेत. अवधूत हे नाव भगवान दत्तात्रेयांचेच आहे. शांतीब्रम्ह पैठण निवासी संत एकनाथ महाराजांच्या खालिल अभंगातून श्री अवधूताचे दर्शन घडून येते.

**दत्तात्रयांचे २४ गुरु :-** श्री संत एकनाथ महाराजांचा अभंग -

**जो जो जयाचा घेतला गुण । तो तो म्यां गुरु केला जाण ।**
**गुरुंसी आले अपारपण । जग संपूर्ण गुरु दिसे ॥**
**ज्याचा गुण घेतला । तो सहजे गुरुत्वा आला ।**
**ज्याचा गुण त्यागरुप घेतला । तोही गुरु झाला अहितत्यागे ॥**
**तो अवधूत जाण दत्तात्रेया । तेने आलिंगूनी यदुराया ।**
**निजरूपाचा बोधु तया । अनुभवावया दीधला॥**

कपोत,पतंग,हत्ती,हरीण- स्त्री संग,मोह,काम.
पृथ्वी,पर्वत,वृक्ष - सहिष्णू,धैर्य,परोपकार.
वायू,आकाश,देह -अनासक्ती,वैराग्य,अलिप्तता.
पाणी -शीतलता,माधुर्य.
अग्नी -तेजस्विता.
सूर्य -दुर्गुणांचा परिहार
अजगर -समाधानी.
समुद्र -अलुब्धता,प्रसाद,गांभीर्य.
माशी,कुकर,सर्प - असंग्रह.
भिंगुरटी - एकाग्रता,ध्यान.
कोळी,कातीन - समदृष्टी,मानापमान.

संत एकनाथ महाराजांनी श्रीदत्तात्रेयांची आरती "त्रिगुणात्मक त्रय मूर्ती दत्त हा जाणा" अशी केली आहे. तर श्री संत तुकाराम महाराजांनी

**तीन शिरे सहा हात । तया माझा दंडवत ॥१॥**
**काखे झोळी पुढे श्वान । नित्य जान्हवीचे स्नान ॥२॥**
**माथा शोभे जटाभार । अंगी विभूति सुंदर ॥३॥**
**शंख चक्र गदा हाती । पायी खडावा गर्जती ॥४॥**
**तुका म्हणे दिगंबर । तया माझा नमस्कार ॥५॥**

असे सुंदर वर्णन अभंगात केले आहे. कांही ठिकाणी एकमुखी दत्तात्रेयाची पूजा-अर्चा दिसून येते. महाभारत, पुराणे, अर्वाचीन उपनिषिदे यातून एकमुखी श्री दत्तात्रेयांचा उल्लेख आढळून येतो. भारत देश हा अध्यात्माचे माहेरघर आहे. ही गुरूचरणांनी पावन झालेली भूमी आहे. प्राचीन ऋषिमुनी अत्यंत उदारमतवादी होते. त्या काळात प्रत्येक व्यक्तीस धार्मिक व वैचारिक स्वातंत्र्य होते. म्हणून पुरातन वैदिक संप्रदायात अनेक मतभेद दिसून येत होते. यामुळे धर्मस्थापक ऋषिमुनींनी आपापल्या अनुयायांना नित्यनैमित्तिक आचरणाबाबत निर्दिष्टांचे मार्गदर्शन केल्याने, समाजात आचारभिन्नता

दिसून आली आणि निरनिराळे पंथ अस्तित्वात आले. असे असून देखील वैदिक धर्माचा अंतिम उद्देश मोक्षप्राप्ती किंवा ब्रम्हात्मैक्य हा एकच होता. विविधतेतून एकता हेच सनातन धर्माचे वैशिष्ट्य आहे.
या जुन्या उदारमतवादामुळे समाजात द्वैत, अद्वैत, विशिष्ट द्वैत, शक्तीपद्धती, शाक्त पंथ, अवधूत पंथ अशा अनेक पंथांचा उदय झाला. या सर्वामध्ये अवधूत संप्रदाय अत्यंत प्राचीन होता. अवधूत संप्रदायाचे आद्यप्रवर्तक श्री दत्तात्रय स्वयंभू. त्यांनी भगवान श्रीरामास त्रिपुरा रहस्य सांगितले. विभक्ती संप्रदायाचा अवधूत संप्रदायाशी जवळचा संबंध आहे. श्रुती शास्त्रांच्याप्रमाणे गुप्तज्ञान स्वानुभवाने सिद्ध करून दत्तात्रयां अवधूत मार्गाचा प्रचार केला.

**४.५) समर्थ संप्रदाय :-** महाराष्ट्रात इसवी सन सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात समर्थ रामादासांचे कार्य आणि शिकवण यांतून प्रवर्तित झालेला एक पंथ समर्थ संप्रदाय हे त्याचे प्रचलित असलेले दुसरे नाव रामदासी पंथ असे ही आहे. श्रीरामचंद्र ही प्रमुख देवता, श्रीहनुमान ही दुसरी रामनवमी व हनुमानजयंती हे दोन प्रमुख उत्सव. समर्थांच्या निर्वानानंतर त्यांत दासनवमीची भर पडली. चाफळ व सज्जनगड ही दोन प्रमुख स्थने सांप्रदायिकांना पूज्य. दासबोध आणि मनाचे श्लोक या समर्थांच्या दोन रचना सर्वांत महत्त्वाच्या व नित्यपाठातील. समर्थांनी स्थापन केलेले मठ व तेथे नियुक्त केलेले महंत ही संप्रदाय स्थापन केल्याची महत्त्वाची खूण. नासिक-टाकळी येथे बारा वर्षे केलेल्या पुरश्चरणानंतर समर्थांनी भारतातील सर्व भागांत तीर्थयात्रा केली. त्या काळातच त्यांनी शिष्य करण्यास प्रारंभ केला, तेथे या संप्रदायाच्या संकल्पाची मूळ प्रेरणा शोधता येते. ही प्रेरणा त्या काळातील इस्लामच्या सार्वत्रिक स्वरूपाच्या धार्मिक व राजकीय आक्रमणांशी संबंधित होती, हा या संप्रदायाचा सर्वाधिक महत्त्वाचा विशेष होय. त्यातच त्याचे वेगळेपण शोधता येते. समर्थांनी अकराशे मठ स्थापन केले अशी समजूत आहे. इतिहासाच्या निकषावर ती टिकत नाही. मठांची गावे व मठपतींची नावे यांच्या आधारे साठसत्तर मठांची माहिती मिळते. आंध्र प्रदेशात इंदूरबोधन व दक्षिणेत तंजावरजवळ मठ होते. तेथवर संप्रदायाचा प्रसार पोहोचला होता. काशी, अयोध्या, मथुरा, अवंती, द्वारका, बद्री-केदार अशा दूरच्या स्थळी मठ असल्याचा उल्लेख आढळतो. पण त्यांचे अस्तित्व संशयास्पद आहे. अशा स्थळी समर्थांचा एखादा अनुग्रहीत असणे शक्य आहे.

**तत्त्वज्ञान** - समर्थांना अभिप्रेत असलेले तत्त्वज्ञान प्राधान्याने त्याच्या जुना आणि नवा दासबोध, आत्माराम, पंचसमासी, सप्तसमासी अशा ग्रंथांतून व स्फुट प्रकरणांतून पाहता येते परंपरागत अद्वैतसिद्धांत आणि त्याला भक्तीची जोड हाच त्यांच्या तत्त्वज्ञानावर द्वैतमताची छाया होती, असे म्हणण्याचा प्रयत्न एकदोन विद्वानांनी केला आहे, पण समर्थांचे ग्रंथ पाहता तो टिकत नाही. ज्ञानोत्तर कर्म व अवतार-कल्पना भगवद्गीतेतून, तर नवविद्या भक्तीची कल्पना समर्थांनी भागवतातून घेतली आहे. पण कोणत्याही एका ग्रंथाचे वा आचार्यांचे अनुकरण त्यांनी केलेले नाही. सगुणापेक्षा निर्गुणाचे महत्व आणि आत्मनिवेदन भक्तीचा वेगळा उलगडा व पुरस्कार हे त्यांच्या विचारांचे विशेष आहेत.

पण समर्थांचा तत्त्वज्ञानविचार एवढाच नाही. तो विचार ऐहिकाच्या पातळीवर येतो व देशकालपरिस्थितीचे वास्तव भान ठेवतो, हा त्याचा इतर सर्व संप्रदायांहून असलेला वेगळेपणा आहे.

दासबोधाचा उत्तरार्ध व काही स्फुट प्रकरणे यांत त्याची स्वच्छ खूण आहे. हरिकथानिरूपण मुख्य मानून त्याला त्यांनी राजकारण व सर्वविषयी सावधपण यांची जोड दिली. स्वधर्माच्या रक्षणासाठी स्वराज्य हवे हे जाणले, प्रयत्नवाद व लोकसंग्रह यांचा पुरस्कार केला आणि परकीय आक्रमणाचा प्रतिकार पराक्रमाने करावा असा संदेश दिला. हा समर्थांनी समाजाला दिलेल्या शिकवणुकीचा सर्वांत महत्त्वाचा विशेष आहे. समर्थांचे जीवन मूलतः आध्यात्मिक पातळीवरचे, वृत्ती पूर्ण विरक्त पण त्यांच्या शिकवणुकीत परमार्थाबरोबरच प्रवृत्तिपरतेचा महिमा ठाशीवपणाने सांगितला आहे. त्यांच्या आयुष्याचा उत्तरार्ध व त्या कालातील त्यांची रचना यांमध्ये त्यांचा सक्रिय प्रवृत्तिपर दृष्टिकोण दिसतो. तो ध्यानात घेतला म्हणजे त्यांनी प्रवर्तित केलेल्या संप्रदायाचे तत्त्वज्ञान पूर्ण होते.

**संप्रदायाची लक्षणे :-** आपल्या संप्रदायाचे विशिष्ट आचार समर्थांनी नेमकेपणाने कोठे सांगितले नाहीत. त्याविषयीच्या त्यांच्या कल्पना निरनिराळ्या रचनांतून आलेल्या स्फुट उल्लेखांवरून ठरवाव्या लागतात. संप्रदायाची वीस लक्षणे त्यांनी एके ठिकाणी सांगितली आहेत. लिहिणे, वाचणे, अर्थांतर सांगणे, अर्थभेद व आशंकानिवृत्ती, त्याबरोबर गायन, नर्तन, टाळी वाजवणे असे मामुली तपशीलही त्यांत आले आहेत. लोक राजी राखणे, प्रसंग व काळ जाणणे, सर्वांशी समान वागणे, राजकारण हे भाग लोकसंग्रहाशी संबंधित आहेत. शिष्यांसाठी नियम, निस्पृह किंवा महंत यांची लक्षणे, भिक्षानिरूपण यांवर अनेक स्थळी विवरण आहे. ब्रह्मचर्यव्रत व त्याचा पुढचा भाग म्हणजे संन्यस्त वृत्ती, उदंड भ्रमण व भिक्षावृत्ती या त्यांच्या संप्रदायातील शिष्यत्वाच्या खुणा आहेत. भिक्षेचा संबंध ते अखेर समाजनिरीक्षणाशी जोडतात. इंदूरबोधन मठाचे अधिपती श्रीसमर्थदास यांनी श्रीसमर्थसांप्रदायिक नित्यनेमसोपान या शके १८४८ (इ. स. १९२६) मध्ये प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात समर्थ संप्रदायातील भिक्षेचे नियम दिलेले आहेत. मेखला, शिरोवस्त्र, झोळी, कमरेस बांधावयाचे रामनामांकित वस्त्र व भगवे निशाण अशी पंच वस्त्रे भिक्षेच्या वेळी असावीत. भिक्षा मागून झाल्यावर मनोबोधातील शेवटचा श्लोक म्हणून झोळी देवापुढे ठेवावी व तिची पूजा करून 'सुरवरवरदायिनी' ही आरती म्हणावी, असा भिक्षेच्या आचाराचा भाग समर्थदासांनी सांगितला आहे. तो परंपरेने त्यांच्यापर्यंत आला असावा, असे मानता येईल. हुरमुजी रंगाची वस्त्रे मस्तकी जटाभार, गळ्यात मेखला, हातात माळ, काखेत कुबडी व पायात खडावा असा समर्थांचा वेष होता असे वर्णन आहे. शिष्यांकडून त्याचे अनुकरण होत असावे व त्यावरून तो समर्थ संप्रदायाचा विशिष्ट वेष होता, असे म्हणता येते.

समर्थांनी केलेले अपार लेखन हा त्यांच्या संप्रदायातील वाङ्मयाचा मूलाधार होय. गिरिधरांसारख्या त्यांच्या सहवासात अल्पकाळ वावरलेल्या शिष्यांपासून समर्थांचे थोरले बंधू श्रेष्ठ किंवा रामीरामदास, मेरुस्वामी, माधवस्वामी, हरिबुवा भोंडवे, आत्मारामहाराज एक्केहाळीकर ते एकोणिसाव्या शतकातील हंसराजस्वामी येथवर या संप्रदायातील ग्रंथकारांची परंपरा येऊन पोहोचते. समर्थचरित्रपर, तत्त्वज्ञानपर, कथापर व स्फुट अशी ही रचना आहे. समर्थांच्या शिष्या वेणाबाई यांच्या रचनेचा स्वतंत्र उल्लेख करणे आवश्यक आहे.

**४.६) वीरशैव संप्रदाय :-** हा एक शैव संप्रदाय. ह्यालाच 'लिंगायत पंथ' असेही म्हणतात. शिवोपासना हा मूलाधार असलेले, अनेक शैव पंथ काळाच्या ओघात निर्माण झाले. वीरशैव पंथ हा त्यांपैकीच एक होय.'वीरशैव' ह्या नावाच्या अनेक व्युत्पत्त्या देण्यात येतात. कोणत्याही खडतर परिस्थितीत रणांगणावरील वीराप्रमाणे शैव धर्माचे जो पालन करतो तो 'वीरशैव', अशा आशयाची एक व्युत्पत्ती वीरशैवांच्या पारमेश्वरतंत्रात देण्यात आलेली आहे. वीरशैव पंथाची उभारणी कामिका ते वातुलपर्यंतच्या २८ आगमांवर व तंत्रांवर करण्यात आलेली असून उपर्युक्त पारमेश्वरतंत्र हा त्या आगमांपैकीच एक होय. निर्धाराने परमार्थप्रवण राहून ईश्वरभक्ती करणाऱ्याला 'वीर' म्हणण्याची प्रथा आहे.

वीरशैव पंथाची स्थापना बाराव्या शतकात बसवेश्वरांनी (११३१-६७) केली असे मानणारे काही विद्वान आहेत. तथापि बसवेश्वरांचा जीवनवृत्तांत देणाऱ्या बसवपुराणावरून (प्रकाशित १९०५) तसे दिसत नाही. वीरशैव हे आपली परंपरा बसवाचार्यांच्या पूर्वीची असल्याचे मानतात. शिवाच्या सद्योजातादी पंचमुखांपासून रेणुक, दारूक आदी पंचाचार्य अवतरले त्यांची नावे युगपरत्वे भिन्न आहेत, असे ते मानतात. ह्या पाच आचार्यांची कलियुगातील नावे रेवणाराध्य, मरूळाराध्य, एकोरामाराध्य, पंडिताराध्य आणि विश्वाराध्य अशी आहेत.

ह्या पंचाचार्यांना 'जगद्‌गुरू' असे म्हटले जाते. ह्यांचे गोत्रपुरूष वर दिलेल्या अनुक्रमाने वीरभद्र, नंदी, वृषभ, भृंगी आणि स्कंद असे आहेत. त्यांची सूत्रे, प्रवर, शाखा इत्यादींना अनुसरून शिष्यसंततीला 'पंचम' असे म्हणतात. पंचाचार्यांची पीठे ही गुरूपीठे म्हणविली जातात. त्यांचे शाखामठ, गुरूस्थलमठ शेकडोंच्या संख्येने देशात सर्वत्र, आणि विशेषतः कर्नाटकात आहेत. पाशुपत, कालामुख अशा शैव पंथांनी वीरशैव पंथाला पाठबळ मिळाले. मात्र हे पंथ म्हणजे वीरशैव पंथाची पूर्वरूपे नव्हेत. बसवेश्वरांनी ह्या पंथांना एकत्र आणले, त्यांना संघटित केले. बसवेश्वरांप्रमाणेच अल्लमप्रभू (बारावे शतक), अक्कमहादेवी (बारावे शतक), चेन्नबसव ( सु. बारावे शतक ), सिध्दरामेश्वर, नीलांबिका यांनाही वीरशैव पंथाला भक्कम पायावर उभे करण्याचे श्रेय दिले जाते.

आठवे ते दहावे शतक ह्या कालखंडात केव्हातरी होऊन गेलेले शिवयोगी शिवाचार्य ह्यांनी संस्कृतात रचलेला सिध्दान्तशिखामणि हा वीरशैवांचा पंथग्रंथ होय. वीरशैवांच्या आगमानंतरचा हा पहिला संस्कृत पंथग्रंथ. वीरशैवांच्या तत्त्वज्ञानाची सुसूत्र मांडणी श्रीपती पंडितांनी (अकरावे शतक) ब्रह्मसूत्रांवर श्रीकरभाष्य लिहून केली. ह्या भाष्याच्या मंगलाचरणात रेवण, मरूळ आणि एकोराम ह्या वीरशैव आचार्यांना वंदन केले आहे.

बसवेश्वर आणि त्यांच्या काळातील अन्य वीरशैव संतांनी कर्नाटकातील कल्याणी म्हणजेच बसवकल्याण (जि. बीदर) येथे अल्लमप्रभूंच्या अध्यक्षतेखाली शून्यसिंहासनाची स्थापना केली. शून्यसिंहासनाला 'निराभारी' किंवा 'विरक्त पीठ' असेही म्हणतात. शून्यसिंहासनाचे पाच समय किंवा पोटभेद आहेत, ते असे : (१) मुरघा, (२) चीलाळ, (३) कुमार, (४) केम्पिन, (५) संपादनेय. ह्यांचे विरक्त मठ कर्नाटकात सर्वत्र आहेत. त्यांपैकी चित्रदुर्ग मठ, मूरसाविर मठ, मुरघा मठ, तोंटद सिद्धेश्वर मठ आदी विशेष प्रसिद्ध आहेत.

वीरशैवांचे मूळ साहित्य संस्कृतात असल्याने सामान्यांना ते दुर्गम झाले बसवेश्वरांनी आणि त्यांच्या काळातील अन्य वीरशैव संतांनी आपल्या आध्यात्मिक चर्चेतून जे 'वचन साहित्य' निर्माण केले, ते सर्वसामान्यांना सहज समजणाऱ्या कन्नड भाषेत.'वचन' म्हणजे गद्यसदृश, लयबध्द काव्य. ह्या वचनांतून शिवभक्तीप्रमाणेच अनेक सामाजिक विषयही हाताळलेले आहेत.

कर्मकांडाचे स्तोम, अनेक देवांची उपासना, अनाचार, वर्णव्यवस्था व जातिभेद, उच्च-नीच भाव, हिंसाचार ह्यांना वीरशैवांनी प्रखर विरोध केला. आध्यात्मिकता, शिवभक्ती, सामाजिक समानता ह्यांचा त्यांनी पुरस्कार केला. स्त्री-शूद्रांना सर्व क्षेत्रांत समान अधिकार, श्रमप्रतिष्ठा, सत्य, अहिंसा आदी सद्गुणांचे महत्त्व त्यांनी पटवून दिले. समाजातील सर्व जातिजमातींना वीरशैव पंथात प्रवेश मिळू लागला.

वीरशैवांचे 'सामन्य', 'विशेष' आणि 'निराभारी' असे तीन भेद आहेत. सर्वसामान्य भक्तांना 'सामान्य' म्हणतात. पुरोहित, जंगम, गुरू, मठाधिकारी हे 'विशेष' आणि विरक्त मठांचे स्वामी हे 'निराभारी' होत. निराभारी म्हणजे संसारत्याग करून सर्व बंधनांच्या भारातून मुक्त झालेले.

**तत्त्वज्ञान व आचारधर्म :** वीरशैवांचे तत्त्वज्ञान हे 'शक्तिविशिष्टाद्वैत' ह्या नावाने ओळखले जाते. ह्या नावाचे स्पष्टीकरण असे : शिव हा सर्वज्ञ, सर्वकर्तृत्ववान आहे सर्व प्रकारच्या सूक्ष्म चिद्‌चित् शक्ती त्याच्या ठायी आहेत. जीव हा अल्पज्ञ, अल्पकर्तृत्ववान असून त्याच्या ठायी स्थूल स्वरूपाच्या चिद्‌चित् शक्ती आहेत. असे असले, तरी वरील 'सर्वज्ञत्व' इ. गुणांनी विशिष्ट असलेला शिव आणि 'अल्पज्ञत्व' इ. गुणांनी विशिष्ट असा जीव ह्यांच्यात अभेद वा अद्‌वैत आहे, असे सांगणारे तत्त्वज्ञान व विद्या म्हणजे 'शक्तिविशिष्टाद्‌वैतवाद' होय. आणि ह्या तत्वज्ञानात वा विद्येत (वी) जो रमतो (र) अर्थात विद्येत रमणारा तो वीरशैव ही व्युत्पत्ती दिलेली आहे.

**भक्तस्थल :** ह्या पायरीवर जीवाला शिव हा नित्य परमानंदमय आहे, अशी जाणीव होते. म्हणजेच महेश्वतत्त्वाचा आविर्भाव त्याच्या ठायी होतो. जीव शिवाची भक्ती करू लागतो. ही इष्टलिंगोपासना असते.

**महेशस्थल** : ह्या पायरीवर शिवाचा सर्वश्रेष्ठत्वाचा प्रत्यय जीवाला वा भक्ताला येतो. हा सदाशिवत्वाचा साक्षात्कार होय. तो झाल्यावर भक्त अत्यंत निग्रहाने शिवोपासना करू लागतो. वीरव्रती होतो. येथे माहेश्वरलिंगाची उपासना तो करतो.

**प्रसादीस्थल :** ह्या पायरीवर सुषुम्णामार्गाने कुंडलिनीने षट्चक्र भेदले जाते आणि शिवयोगाभ्यासाच्या सामर्थ्याने ब्रह्मरंध्राच्या ठायी शिवशक्तिसंयोग होतो. जीव सर्व सुखोपभोग शिवाच्या प्रसादासाठी सोडून देतो. ही जीवाची प्रसादी अवस्था होय. ह्या अवस्थेत प्रसादीलिंगाची उपासना तो करतो.

**प्राणलिंगीस्थल** : ह्या पायरीवर जीवनाबद्दलची आसक्ती राहत नाही. बाह्य स्वरूपाची उपासना संपून ती आंतरिक होते. अहंता नष्ट होते. मन पूर्णतः शिवावर केंद्रित होते. जीव प्राणलिंगाची उपासना करतो.

**शरणस्थल** : ही पूर्णपणे शिवशरणतेची अवस्था असते. ह्या अवस्थेत जीव भावलिंगाची उपासना करतो. ह्या अवस्थेत त्याला अणिमादी ऐश्वर्यसंपन्नता, म्हणजे अणिमा, लघिमा इ. आठ सिध्दी प्राप्त होतात.

**ऐक्यस्थल** : ही अखेरची-शिवाशी ऐक्य पावण्याची-पायरी. ह्या अवस्थेत त्याचे महालिंगाशी ऐक्य होते. ही जीवन्मुक्तीची अवस्था असते.

षट्स्थलांची सांगड योगमार्गातील षट्चक्रांशी घातली गेल्यामुळे षट्स्थलसाधनेला 'शिवयोग' असेही म्हटले जाते.

**अष्टावरण** : भक्ताला मार्गदर्शन आणि संरक्षण देण्यासाठी अष्टावरणांची योजना आहे. गुरू, लिंग, जंगम हे पूजनीय भस्म, रूद्राक्ष, मंत्र ही पूजेची साधने आणि पादोदक व प्रसाद ही त्या पूजेची फळे. अशी ही आठ आवरणे म्हणजे आध्यात्मिक कवचकुंडले.

**गुरू** : प्रत्येक वीरशैवाला, त्याच्या कुटुंबासह, पंचपीठांपैकी एका शाखेच एकच गुरू असतो. तो शिष्याच्या घरी सर्व धार्मिक कार्यात उपस्थित राहून त्याचे मार्गदर्शन करतो गुरूकडून इष्टलिंग दीक्षा व मंत्रोपदेश घेऊन आचारधर्मानुसार वागणे हे प्रत्येकाचे कर्तव्य.

**लिंग** : गुरूकडून प्राप्त झालेले इष्टलिंगच शिष्याने आपल्या शरीरावर नित्य धारण करून, शुचिर्भूत होऊन त्याची पूजा करावी. त्याचा कधीही वियोग होऊ नये.

**जंगम** : गुरूप्रमाणे जंगम हाही भक्तांच्या घरी जाऊन सर्व धार्मिक विधी करतो. समाजात सर्वत्र संचार करून धर्मप्रचार करणे हे त्याचे कर्तव्य. गुरूच्या अनुपस्थितीत गुरूची सर्व कामे हा करू शकतो शास्त्राने गुरू, लिंग, आणि जंगम ही एका शिवाचीच तीन समान रूपे मानली आहेत.

पूजा करताना भस्म, रूद्राक्ष व गुरूकडून प्राप्त झालेले शिवपंचाक्षरी अथवा षडाक्षरी मंत्र यांचा उपयोग केला जातो. गुरूलिंग जंगमांच्या चरणतीर्थाला पादोदक म्हणतात आणि त्यांना अर्पण केल्यानंतर आशीर्वादरूपाने मिळणाऱ्या सर्व वस्तूंना प्रसाद म्हणतात.

**पंचाचार** : अष्टावरण आणि पंचाचारांत आचारधर्मांचे विशेष वर्णन आहे. शिवाचार, लिंगाचार, सदाचार, भृत्याचार आणि गणाचार हे प्रमुख पंचाचार होत

वीरशैवशास्त्रानुसार वीरशैव व्यक्तीस षट्स्थलसाधनेने एकाच जन्मात मुक्ती मिळते.

**४.७) नागेश संप्रदाय :-** वडवाळ क्षेत्रीचे नागनाथ यांनी नागेश संप्रदायाचा आरंभ केला आहे. हा संप्रदाय उदार अंतःकरणाचा. वैष्णव, वीरशैव या सगळ्यांना आस्थेने जवळ करणारा आहे. नागेशांच्या नावाशी संलग्न असलेले व त्यांचे स्वतंत्र व्यक्तिमत्व प्रस्थापित करणारे वडवाळ हे गाव कोणते? वडवळ नावाची दोन गावे आहेत. सोलापूर जिल्हयातील मोहोळजवळचे वडवळ. दोन्ही ठिकाणी नागनाथांची मंदिरे आहेत. सोलापूर जिल्हयातील मोहोळजवळचे वडवळ आणि उस्मानाबाद जिल्हयातील लातूचे जवळचे वडवळ. दोन्ही ठिकाणी नागनाथांची मंदिरे आहेत. उस्मानाबाद जिल्हयातील वडवळला 'वडवळसिद्ध नागेश' असेच म्हणतात. मराठवाड्यातील औंढा नागनाथ या स्थानाशी नागेश संप्रदायाचा काही संबंध आहे काय? नागेश संप्रदायविषयक साहित्य आणि या संप्रदायाचे अनुयायित्व पत्करलेली

घराणी ही सोलापूर जिल्ह्यातच आढळतात. त्यामुळे सोलापूर जिल्ह्यातील वडवळ हेच नागेशांचे स्थान, असा निर्णय घेण्याकडे संशोधकांचा कल आहे.

नागेशांचा निश्चित कालनिर्णय करणे कठीण आहे. नागनाथ ज्ञानदेवांचे समकालीन असल्याबद्दलची समजूत 'महाराष्ट्र सारस्वत' कारांनी नोंदलेली आहे. गो. का. चांदोरकर संपादित 'महाराष्ट्रीय संतकवि काव्य सूची' त इ. स. १३६८ ते १४१८ असा नागनाथांचा काळा दिलेला आहे. अज्ञानसिद्ध हे नागनाथांचे प्रसिद्ध शिष्य. त्यांच्यावर नागनाथांचा अनुग्रह शके १३१३ म्हणजेच इ .स. १३९१ मध्ये झाला असा निंदेश आढळतो. अज्ञानसिद्धांनी आपल्या 'संकटहरणी' नामक ग्रंथात असे म्हटले आहे :

**शके तेराशे तेरा । मार्गशीर्ष शुद्ध नवमी गुरुवारा ।**
**प्रकटला नागेश फणीवरा । भवतशिरी डुल्लत ॥**

'नागेश लीलामृत' हा नागेशसंप्रदायाचा महत्त्वाचा ग्रंथ. नागनाथांची भक्ती ज्या घराण्यात परंपरेने चालत आलेली आहे त्या घराण्यातील भास्कर उर्फ भानजी नामक गृहस्थाने लिहिलेला आहे.

**तत्वज्ञान :-** वरद नागेश ह्न्थामध्ये या संप्रदायाचे तत्वज्ञान आहे.हा संप्रदाय इतरांप्रमाणेच अद्वैतवादी आहे.

**जे निरोपिले वेदांती । प्रतिष्ठिले उपनिषदार्थी ।**
**ते ब्रम्ह प्राकृत दृष्टांती । सांगो तुज ॥**

**४.८) सुफी संप्रदाय :-** इसवी सन तेराव्या शतकात काही सूफी संत दक्षिण भारतात आले. सूफी संताचे औरंगाबाद गंगापूर पैठण दौलताबाद खुलताबाद ही मराठवाड्यातील प्रमुख केंद्रे होती त्यांतले पैठण हे महत्त्वाचे प्रमुख केंद्र होते. मराठवाड्यात प्रथम मोईजुद्दीन व नंतर निजामुद्दीन यांनी सूफी संप्रदायाचा प्रसार केला. दिल्लीत वास्तव्य असलेल्या निजामुद्दीन अवलियाच्या प्रेरणेने त्याचा शिष्य मुंतजबोद्दीन जर्जरी बक्ष याने आपल्या धर्मप्रचारकांसह महाराष्ट्रात खुलताबादेस मुक्काम केला होता. सूफी पंथ हा गाढ भक्तीचा तसेच वैराग्य तपश्चर्या व मानवतावाद इत्यादींना आदर्श मानणारा संप्रदाय होता.

सूफी या शब्दाची व्युत्पत्ती अनेक शब्दांतून झाली आहे. अरबी भाषेत "सूफ' म्हणजे चबुतरा.'साफ' म्हणजे शुद्ध व "सोफिया' म्हणजे ज्ञान. या दोन शब्दांपासूनही "सूफी' हा शब्द तयार झाला आहे असे अभ्यासकांचे मत आहे. सफा या शब्दाचा अर्थ पांढरे वस्त्र असाही होतो जो पांढरे वस्त्र परिधान करतो तो सुफी अर्थात फकीर असा होतो.सुफिचे मूळ स्त्रोत इस्लाम आहे.बगदाद हे या संप्रदायाचे केंद्र आहे. भारतात सुफी संतांवर उपनिषदाचा प्रभाव असल्याचे अभ्यासक सांगतात.अकराव्या शतकात अल्बेरुनी यांनी सांख्य,योग,मीमांसा यांचा अनुवाद केलेला आढळतो.

**४.९) आनंद संप्रदाय** :- महाराष्ट्रातील हा एक प्रमुख प्राचीन संप्रदाय असून तो बसव कल्याण येथून सुरु झाला. या संप्रदायातील अख्यानकवी श्रीधर स्वामी नाझरेकर होवून गेले. त्यांची गुरु परंपरा श्री दत्तात्रय - सदानंद - रामानंद - आमलानंद - गंभीरानंद - ब्रम्हानंद - सहजानंद - पूर्णानंद - दत्तानंद -

ब्रम्हानंद - कवी श्रीधर अशी होती. त्यांनी त्यांच्या काव्य रचनेतून व "श्रीराम विजय" ग्रंथातून उत्कृष्ट श्री दत्त भक्ती गायली आहे. पूर्णानंद नारायण हे स्वामी सहजानंदाचे शिष्य होते. ते एक महान साधू होते. बसव कल्याणीतील बरीच मुस्लीम मंडळी त्यांची शिष्य होती. त्यातच बेदरचा बादशहा शहा मुंतोजी, बहामनी होय, सहजानंदाच्या या शिष्याचे नाव गुरु परंपरेने ज्ञानसागरानंद होते, मृत्यूंजय स्वामी होते. पूर्णानंद नारायण यांनी लिहीलेल्या "गुरुगीतेत" या आनंद संप्रदयातील सर्व गुरुंची गुरु तत्वाची चर्चा दिसून येते. या "गुरुगीता" ग्रंथावर मुकुंदराज लिखित "विवेकसिंधू" ग्रंथाचा प्रभाव आहे. गुरुगीता व विवेकसिंधू या मधील ओव्यामधून साम्यस्थळे व गुरुस्तुतीच आढळून येते आनंद संप्रदयातील सत्पुरुषांची विवेकसिंधूवर अत्यंतिक श्रध्दा दिसून येते आनंद संप्रदयाचे आदीगुरु दत्तात्रेय असल्याने या संप्रदयात गुरुगीतेला असाधारण महत्व आहे. पूर्णानंद नारायण हे संत श्री एकनाथ महाराज यांचे नातजावई आहेत. त्यांचे पुत्र शिवरामस्वामी होय. तर श्री रंगनाथस्वामी निगडीकर, श्री केशवस्वामी भागानगरकर हे शिवराम स्वामींचे गुरुबंधू आहेत

**गुरुदेव दत्ता, अनंत ब्रम्हांडी तुझी सत्ता ॥ धृ.॥**
**विश्वव्यापका विश्वंभरीता, विश्वधीशा विश्वातीता ।**
**प्रमेय-प्रमाता- प्रमाणरहीता, जगद्गुरु अवधूता ॥१॥**
**नित्य निरंतर अगमागोचर, परात्परतर सुखदाता ।**
**दीनदयाकर दत्त दिगंबर, सत्यज्ञानानंता ॥२॥**
**नि:संगा निजरंगा सत्वर, धावेधावे आता ।**
**निजात्मदर्शन देवूनी निरसी, दुर्गयममता चिंता ॥३॥**

वरील प्रमाणे भगवान दत्तात्रेयाची स्तुती श्री रंगनाथस्वामी निगडीकरांनी गायली आहे.या संप्रदायाचे तत्वज्ञान हे केवलाद्वैत आहे.

**५) समारोप** - सर्व धर्म व संप्रदाय हे मानवी कल्याणासाठीच आहेत.त्यात काही द्वैती तर काही अद्वैती आहेत.हिंसेवर विजय प्राप्त करणारा धर्म म्हणजे बौध. इंद्रियांवर विजय प्राप्त करणारा धर्म म्हणजे जैन. ईश्वराची सगुण भक्ती करणारा संप्रदाय म्हणजे महानुभाव ईश्वराची केवळ निर्गुण भक्ती करणारा संप्रदाय म्हणजे सुफी.ईश्वराची सगुण व निर्गुण भक्ती करणारे संप्रदाय म्हणजे शैव,वारकरी,दत्त,आनंद.समर्थ,नागेश,वीरशैव आदि.

संदर्भ:-

१. पाच भक्ती संप्रदाय - डॉ.र.रा.गोसावी
२. संत साहित्य,आकलन आणि अध्यापन -महारष्ट्र शिक्षण मंडळ.
३. मराठी विश्वकोश

**विविध भक्तीसंप्रदायाची परंपरा,शिकवण व समन्वय.**

**ह.भ.प.डॉ.प्रमोद रामकृष्ण कुमावत.**